वर्ष पाचवे | अंक ११ | मे २०१८ | पृष्ठे ५२

अहम् आवाम्

# वयम्

कल्पक, चौकस किशोरांचे मासिक

मूल्य ₹३०/-



## कथा विशेषांक


मिनू
अदिती पाध्ये-देसाई
aditeepd@gmail.com
आई, तू सगळ्या शेजाऱ्यांकडून प्लास्टिकच्या बाटल्या आणि पिशव्या का मागवल्यास?
अगं आता सरकार प्लास्टिक बंदी लागू करणारे ना. मग मी या वस्तू गोळा करून एका संस्थेला देणार, जी यांचा पुनर्वापर करेल.
पुनर्वापर म्हणजे?
सोप्या भाषेत सांगायचं तर टाकाऊतून टिकाऊ वस्तू तयार करणे. कारण या वस्तू अशाच जर कचऱ्यात पडत राहिल्या तर पर्यावरणाचं खूप नुकसान होतं.
आई, मला या सुट्टीत भरपूर वेळ आहे, मी पण करू पुनर्वापर?
जरूर कर. तुला यातल्या हव्या त्या वस्तू वापर.
हे काय! आपण आठवडाभर वस्तू गोळा करूनही इतक्याच प्लास्टिकच्या वस्तू जमल्या?
हम्...त्याचं कारण...आमच्याच घरात प्लास्टिक पुनर्वापराची फॅक्टरी उघडलीये.
म्हणजे?
हे बघितलं तर सरकार पुनर्वापरावर पण बंदी आणेल.
हा हा हा

RNI NO.MAHMUL/2013/53138
अहम् आवाम्
कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
वयम्
वर्ष ५ | अंक ११ | मे २०१८
वैशाख/अधिक ज्येष्ठ शके १९४०

**प्रकाशक**
श्रीकांत बापट

**सल्लागार**
डॉ. अनिल काकोडकर
कुमार केतकर
डॉ. आनंद नाडकर्णी
डॉ. उदय निरगुडकर
अच्युत गोडबोले
राजीव तांबे
श्रीकांत वाड

**मुख्य संपादक**
शुभदा चौकर
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

**मुखपृष्ठ**
निलेश जाधव

**सुलेखन**
अच्युत पालव

**अंकातील चित्रे**
निलेश जाधव व शुभांगी चेतन

**वरिष्ठ उपसंपादक**
क्रांती गोडबोले

**मांडणी-सजावट**
क्रांती गोडबोले

**मुद्रितशोधन**
शिवानी ओक

**वितरण व्यवस्था**
राजेंद्र गोसावी


'वयम्' हे मासिक मालक, प्रकाशक श्रीकांत बापट यांनी ग्राफटोन (इं) प्रा लि. ए १/३१९, शाह ॲण्ड नाहर इंड. इस्टेट, एस. जे. मार्ग, लोअर परेल (प.) मुंबई- ४०००१३, (दूरध्वनी- ०२२-६६६०६५७२/७३) येथे छापून, २०१, नंद चेंबर्स, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२ येथे प्रसिद्ध केले. या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधीन.

**संपादकीय विभाग :**
'वयम्' न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७०
इमेल : info@wayam.in

www.wayam.in

# अंतरंग

**संपादकीय** : शुभदा चौकर– ४
**लखलखीत** : एकनाथ आव्हाड– ६
**सोनू** : डॉ. निधी पटवर्धन– १०
**पक्षी करतात घरटी**– नीना गोडबोले– १२
**पाककला स्पर्धा**– १३
**चुटकीचं जग** : फारूख काझी– १४
**चित्र-आस्वाद** : दत्तात्रय पाडेकर– १८
**सुट्टी विशेष** : शुभांगी चेतन, अदिती पाध्ये-देसाई– २०, ३३, ३७
**Paper Helicopter :** Saurhin Parikh– ४२
**रिव्हर्स टेक्नॉलॉजी** : राजीव तांबे– २२
**कॉम्प्युटरने व्यापलं जग** : श्रीराम शिधये– २७
**गंमतकोडी** : एकनाथ आव्हाड– २९
**आगळे गुरुपूजन** : अलकनंदा पाध्ये– ३०
**तेरा महिन्यांचे वर्ष** : हेमंत मोने– ३४
**सहजशोध** : सोनाली कोलारकर सोनार– ३८
**कल्पककला** : स्वरूपा वक्नाली– ३९
**छोटा शेफ** : तुषार प्रीती देशमुख– ४०
**सुट्टी** : मेघना जोशी– ४१
**समशेर कुलूपघरे** : भारत सासणे– ४२



**ज्येष्ठ पत्रकार आणि 'वयम्' चे सल्लागार कुमार केतकर आता खासदार झाले आहेत. काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधी म्हणून ते आता राज्यसभेचे सभासद बनले आहेत. राज्यसभा हे भारतीय संसदेतील ज्येष्ठ सभागृह.. आपण 'वयम्' परिवारातर्फे केतकर काकांचे अभिनंदन करूया.**





**मुलांनो, यंदा उन्हाळ्याच्या सुट्टीत तुम्ही काय काय मजा केलीत, नवीन काय शिकलात, कोणकोणते नवे अनुभव घेतलेत, ते जास्तीत जास्त ३०० ते ४०० शब्दांत मराठी किंवा इंग्रजीत लिहून 'वयम्'च्या पत्त्यावर किंवा इमेलद्वारे पाठवा. तुमचे अनुभव पाठवण्याची अंतिम तारीख आहे २० जून. निवडक अनुभव-लेखांना प्रसिद्धी मिळेल.**
**इमेल : wayam.magazine@gmail.com**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

'वयम्'वाचकांनो, दर महिन्याला २० तारखेपर्यंत तुम्हांला अंक पोहोचला नाही तर 'वयम्'च्या दूरध्वनी क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात संपर्क साधावा, ही विनंती. **-संपादकीय आणि वितरण विभाग**

# संपादकीय

# हिरवे-हळवे मन

**मे** महिन्याची सुट्टी आणि निसर्ग सहवास यांचे एक घट्ट नाते आहे. वसंतऋतूचा हा काळ निसर्ग-वैभवाने श्रीमंत झालेला असतो. आंबा, फणस, काजू, कलिंगड, द्राक्षे, जांभूळ, करवंद, जाम अशा फळे रसना तृप्त करतात; तर ताम्हण, बहावा, सोनमोहोर, कांचन, गुलमोहोर, चाफा, बकुळ असे वृक्ष डोळ्यांना सुखावतात. आम्ही लहानपणी या काळात एकदा तरी वनभोजन करायचो. एकेकीची आई एकेक पदार्थ करून द्यायची- आमरस, पुरी, आंब्याची डाळ, कैरीचा टक्कू, पन्हे असा मेन्यू असायचा. आमच्या त्या छोट्याशा वनराईत आमची पंगत बसायची. सोनमोहोराच्या फुलांच्या पिवळ्या गालिचावर बसून जेवायचो आणि त्यानंतर मुखशुद्धी (मुखवास) म्हणून विलायती चिंचेच्या झाडाला लगडलेल्या चिंचा काढून खायचो- त्यातला खोबऱ्यासारखा दिसणारा, तुरट-गोड गर खायचो. सुटीत आमची खूपशी जमवाजमवी व्हायची. गुलमोहोराच्या शेंगा, गुंजा, बिट्ट्या, पिंपळाची पाने, पोपटाची पिसे असा खजिना जमवायचो. तेव्हा जंगल-पर्यटन ही चैन अनुभवली नव्हती, पण कोकणात गावी जाणे झाले तर झाडा-पानांत, शेतात हुंदडणे व्हायचे. फणसाच्या पानाचे बैल करणे, चाफ्याच्या फुलाच्या अंगठ्या, बकुळी-कुंदा यांचे गजरे ओवणे असा आमचा टाइमपास असायचा.

पुढे मोठेपणी कमवायला लागल्यावर प्रत्येक उन्हाळ्यात एकेका जंगलात जायला सुरुवात केली. ताडोबाच्या जंगलातला एक अनुभव तर अविस्मरणीय. रात्रीची वेळ होती. आमच्या गेस्ट हाऊसच्या आवारात फिरत असताना समोर अगणित लोलके चमकताना दिसली. एवढे काजवे कसे काय आणि तेही स्थिर, असा प्रश्न पडला. टॉर्च मारला, तर चक्क एक मोठा चितळांचा कळप आमच्याकडे रोखून बघत होता. आम्ही त्यांना काही उपद्रव करणार नाही हे लक्षात आल्यावर क्षणार्धात दौडत




निघून गेला. नंतर त्या जंगलफेरीत अनेक सांबर, चितळ, काळवीट दिसले. त्यांच्या कळपातील मौजमजा, खेळ, लोभस देहबोली अशी अनेक रूपे पाहायला मिळाली.

जंगलचा विषय निघाला की एक पुस्तक हमखास आठवते- 'पाडस'. राम पटवर्धन यांनी अनुवादित केलेले अप्रतिम पुस्तक. भा. रा. भागवत यांचे 'हरीण बालक' हा त्याचा संक्षिप्त अनुवाद आहे. माजोरी किनन रॉलिंग्ज या अमेरिकन लेखिकेची 'द इयर्लिंग' ही कादंबरी जागतिक साहित्यविश्वात महत्त्वाची मानली जाते. फ्लोरिडाच्या जंगलात राहणारा ज्योडी नावाचा मुलगा आणि

त्याचे लाडके पाडस यांच्यातील गहिरे नाते यांत रंगवले आहे. कादंबरीतील निसर्गाची वर्णने फार मोहक आहेत. तुम्हीही या सुट्टीत 'द इयर्लिंग' ही मूळ इंग्रजी कादंबरी किंवा 'पाडस' किंवा 'हरीण बालक' हे अनुवाद यांपैकी काहीतरी नक्की वाचा. या पुस्तकाचा शेवट होत असताना डोळ्यांच्या कडा पाणावतात.

काळविटांची हत्या केली म्हणून सलमान खानला शिक्षा झाल्याच्या बातम्या वाचताना मनात आले, की सलमान खानने कधी द इयर्लिंग, जंगलबुक, रस्किन बाँडची पुस्तके असे काही वाचलेच नसेल का? जंगल बुक, पोकाहोंटाज असे जंगलच्या जीवनावरचे एकाहून एक सरस सिनेमे पाहिले नसतील? ...नाहीतर त्याच्या हातून काळविटांची शिकार झालीच नसती. जोधपूर न्यायालयाने त्याला दोषी ठरवल्यावरदेखील त्याने स्वत:चा गुन्हा मान्य केला नाही. चित्रपटात हळव्या भूमिका करणारा कलाकार प्रत्यक्ष जीवनात असा निष्ठूर कसा वागू शकतो? ज्या वलयांकित व्यक्तींकडे आपण सारे रोल मॉडेल म्हणून बघत असतो, त्यांनी जबाबदारीने वागायला हवे, याचे भान का नसावे? तो कितीही चांगला अभिनेता असला तरी वन्यजीव संरक्षण कायद्याचे उल्लंघन करणे हे चुकीचेच नाही का?

आपल्या साहित्यात कितीतरी गोष्टींचा खजिना आहे, ज्या वाचून आपण समृद्ध होऊ शकतो. इसापनीती, हितोपदेश, बिरबल अशा पारंपरिक गोष्टींपासून ते आजच्या जमान्यातल्या चांगल्या कथा आपल्याला वेगवेगळ्या भावनांजवळ घेऊन जातात. आपल्या अनुभवांच्या पलीकडच्या गोष्टी शिकवतात. त्यातून आपला EQ (भावनांक) वाढतो. आपण आनंदी, समाधानी, जबाबदार, समजूतदार होत जातो.

या सुट्टीत भरपूर गोष्टी वाचा. त्यातल्या आवडलेल्या गोष्टी कळवा, म्हणजे आपण त्या आपल्या इतर दोस्तांनाही सुचवू.

**–शुभदा चौकर**
*cshubhada@gmail.com*

## 'वयम्' दिवाळी अंक २०१७ला दोन पुरस्कार

१) कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे उत्कृष्ट दिवाळी अंकाचे द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक 'वयम्' दिवाळी अंकाला मिळाले आहे. कल्याण येथे झालेल्या समारंभात 'कोमसाप'चे जिल्हाध्यक्ष शशिकांत तिरोडकर यांच्या हस्ते सन्मानचित्र व प्रमाणपत्र देण्यात आले.



२) छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंकस्पर्धेत 'वयम्'ला उत्कृष्ट बालकुमार अंक–द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. पुणे येथे झालेल्या समारंभात 'इन्फ्लक्स'चे अध्यक्ष शिवाजीराव चमकिरे, ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे, 'छंदश्री'चे दिनकर शिलेदार व अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात आला. श्री. देशमुख यांनी 'वयम्'च्या दर्जाबद्दल कौतुकाचे उद्गार काढले. सर्व लेखक, चित्रकार, 'वयम्'–प्रेमी आणि वाचक यांचे आम्ही ऋणी आहोत.



# लखलखीत

**''कल्हईवाला** कल्हई... कल्हईवाला कल्हई...'' एक खास लयीतला मोठ्ठा आणि त्यापाठोपाठ एक लहानसा, किनरा अपरिचित आवाज सलग दोन-तीन वेळा कानावर पडला, तसे बाळू, शमी धावतच खिडकीजवळ गेले. कुणी बरं आरोळी दिली म्हणून खिडकीतून डोकावून ते खाली वाकून वाकून पाहू लागले. डोक्यावर रुमाल बांधलेला एक माणूस आणि त्याच्यासोबत बारीकशी अंगकाठी असलेला एक लहान मुलगा दिसला त्यांना. नेमकी त्याचवेळी बाळू, शमीची आईसुद्धा खिडकीत आली. तिने त्या कल्हईवाल्याला आवाज दिला- ''ए कल्हईवाल्या, इकडे, इकडे... वर बघ.'' कल्हईवाल्याने त्यांच्या खिडकीकडे वर नजर टाकली. आई लगेच म्हणाली, ''वरती ये.''

''आलो आलो...'' एवढं बोलून तो कल्हईवाला त्याच्या मुलासोबत बिल्डिंगच्या गेटमधून आत शिरला.

शमीने आईला विचारले, ''आई, कशाला गं बोलवलंस त्या कल्हईवाल्याला?''

''अगं, आपली जुनी पिढीजात तांब्या-पितळीची खूपशी भांडी धूळ खात पडून आहेत घरात. त्यांची सगळी कल्हई गेलीय आतून. आता कल्हईवाला आलाच आहे तर त्या भांड्यांना आतून कल्हई लावून घेते. मग बघ, कशी ती सारी भांडी लखलखीत होतील. ती वापरता येतील. हल्ली कल्हईवालेच येत नाहीत. तुला माहिती आहे का, तांब्याच्या भांड्यात आंबट किंवा आम्लधर्मी पदार्थ बनविले की, त्यांच्यात रासायनिक प्रक्रिया होऊन अन्न बिघडण्याची शक्यता अधिक असते. कधी कधी अन्नाची चव बिघडते. कधी अन्नपदार्थांचा रंग बदलतो, तर कधी त्या अन्नपदार्थांतून विषबाधा होण्याचा धोकाही संभवतो बरं. हे सारं घडू नये म्हणून तर तांब्या-पितळेच्या भांड्यांना आतून कल्हई लावून घेतली जाते.''

बाळू, शमी आईसोबत स्वयंपाकखोलीत गेले. एक एक करून सारी भांडी काढली. सारी भांडी पाहून शमी म्हणाली, ''बापरे...! आई, केवढी गं ही भांडी. मला तर इतक्या दिवसांत कधीच दिसली नव्हती घरात.''

तेवढ्यात दारावरची बेल वाजली. बाळूने दार उघडलं तर कल्हईवालाच दारात उभा. बाळूचं लक्ष त्याच्या मुलाकडं गेलं. मळकट शर्ट आणि चड्डी घातलेला. जवळपास बाळूच्याच वयाचा, उंचीने काहीसा बुटका, तरतरीत नाकाचा, बोलक्या

डोळ्यांचा, बारीकसा तो मुलगा बाळूकडेच टकमक पाहत होता.

आईने विचारलं, ''का रे बाबा, कुठे मांडलीय तुझी कल्हईची भट्टी?''

कल्हईवाला म्हणाला, ''इथं कोपऱ्यावरच्या केशव नाक्यावरच भट्टी मांडलीय बघा.'' आईचं लक्ष त्याच्या सोबत असलेल्या मुलाकडे गेलं. तिने सहज विचारलं, ''काय नाव तुझं?''

''यदुनाथ..'' मुलाने उत्साहाने सांगितलं.

''शाळेत जातोस? कोणत्या इयत्तेत शिकतोस?''

''आठवीत आहे मी, माई. मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत जातो. आता सुट्टीत बाबांना मदत करतो.'' नम्रपणे यदुनाथ बोलला. बाळूला, शमीला आणि आईलाही यदुनाथचं खूप कौतुक वाटलं.

आई म्हणाली, ''पाणी, सरबत काही देऊ का?''

यदुनाथचे वडील म्हणाले, ''नको, नको, कशाला? तुमची भांडी आणा. आम्ही घेऊन जाऊ भट्टीवर. तिथं यदुनाथची आईही आहेच. लगेच कल्हई करून देऊ आम्ही.'' आई हसून म्हणाली, ''तुम्ही सरबत तरी घ्या. या, आत या.''

आईने त्यांना घरात घेतले. बाळू, शमीने पटकन स्वयंपाकघरात जाऊन झटपट दोन





मोठे ग्लास कोकम सरबत बनवून आणलं. त्या दोघांच्या हातात ते ग्लास दिले. घरात आल्यावर आईने यदुनाथकडे नीट निरखून पाहिलं, तेव्हा तिच्या लक्षात आलं की, त्याचा शर्ट खूपच फाटला आहे. तिला चटकन आठवलं की, मागच्या दिवाळीला बाबांनी बाळूला एक रेडिमेड नवीन शर्ट दुकानातून आणला होता. पण बाळूने तो अजूनपर्यंत वापरलाच नव्हता. तिने लगेच आतल्या कपाटातून तो शर्ट आणला. यदुनाथचं सरबत पिऊन झाल्यावर आई तो शर्ट त्याच्यासमोर धरत म्हणाली, ''यदुनाथ, हा घे शर्ट तुला. आमच्या बाळूसाठी त्याच्या बाबांनी आणला होता, पण त्याने घातलाच नाही. तू घाल. तुझ्या अंगावर शोभून दिसेल.''

यदुनाथला क्षणभर काही कळेनाच. तो दिग्मूढ झाल्यासारखा काही क्षण त्यांच्याकडे नुसता पाहतच राहिला. यदुनाथचे बाबाच मग म्हणाले, ''अहो, कशाला ताई, त्याला नवीन शर्ट?'' यदुनाथही म्हणाला, ''नको, नको माई.''

आई म्हणाली, ''असू दे रे, माझ्याकडून तुला ही भेट.''

यदुनाथचे बाबा म्हणाले, ''घे पोरा, मायेने दिलाय त्यांनी तुला. घे.''

यदुनाथने तो शर्ट घेतला. तो पटकन म्हणाला, ''मी उन्हाळ्याच्या सुट्टीत गावी जाताना घालेन हा शर्ट..'' आई गोड हसली. मग आई, बाळू आणि शमीने मिळून आतून सारी भांडी आणली. मोजली. बाळूने सर्व भांड्यांची वहीत यादीही केली. मग आई कल्हईवाल्याला म्हणाली, आम्हांला तुम्ही फक्त रिक्षापर्यंत ही भांडी न्यायला मदत करा. मग आम्हीच घेऊन येऊ ती तुमच्या भट्टीपर्यंत. कोपऱ्यावरच्या केशव नाक्याच्या बाजूच्या पटांगणातच भट्टी आहे ना तुमची? माहीत आहे आम्हांला तो नाका.''

आई, बाळू व शमीने मिळून रिक्षाने ती भांडी कल्हईवाल्याच्या भट्टीजवळ आणली. तिथे जमिनीत छोटा खड्डा करून त्यात तयार केलेली भट्टी आता खासच लालबुंद झाली होती. कल्हईवाल्याने

त्या विस्तवावर आधी आतल्या बाजूने भांडं तापवलं. मग पांढऱ्या रंगाची नवसागराची म्हणजेच अमोनियम क्लोराइडची भुकटी वापरून एकेक भांडं आतल्या बाजूने घासून पुसून आधी स्वच्छ केलं. मग ते भांडं गार होण्यापूर्वीच त्याने कथील धातूचा तुकडा त्या भांड्यात टाकला. तो धातू पटकन त्या गरम भांड्यात वितळला. कल्हईवाल्याने तो वितळलेला धातू मग भांड्यात सर्वत्र चांगला पसरवून त्याचा लेप आतून दिला. आणि लगेच ते भांडं त्याने थंड पाण्यात बुडवलं. चर्र आवाज झाला. आता भांडं आतून चांगलंच लखलखीत, चकचकीत झालं होतं. बाळू, शमी हे पाहून हरखलेच. शमीला तर ही एकप्रकारची जादूच वाटली.

आईने विचार केला, किती वेळ असं सगळ्या भांड्यांना कल्हई होईपर्यंत रस्त्यावर मुलांसोबत थांबायचं. कल्हईवाल्याने आईचा चेहरा वाचला जणू. तो लगेच म्हणाला, ''ताई, तुम्ही घरी जा हवं तर. कल्हई झाली की आम्ही ती भांडी घेऊन येऊ तुमच्या घरी. माई, नका थांबू उन्हात. शिवाय भट्टीचीही उष्णता खूप आहे. जा तुम्ही खुशाल घरी.''

आईची काहीशी द्विधा मन:स्थिती झाली. मग तिने मनाशी ठरवलं. दोन-तीन तासांचाच प्रश्न आहे. ठेवूया विश्वास. जाऊया आपण घरी. आई मुलांना घेऊन घरी निघून गेली.

घरी येऊन आता त्यांना पाच तास झाले. पण कल्हईवाला भांडी घेऊन घरी काही आलाच नाही. आईची चलबिचल वाढली. आपली भांडी त्यांनी लंपास केली की काय? नको नको ते विचार डोक्यात आले. मग ती एकटीच तडक घराबाहेर पडली. रिक्षात बसून कल्हईवाल्याच्या भट्टीजवळ पोहोचली. पण तिथे ना भट्टी, ना कल्हईवाला, ना त्याची पत्नी, ना मुलगा. आई रडकुंडीला आली. आता कुठे शोधू त्यांना? ना त्यांचा ठावठिकाणा माहीत. गेली आपली भांडी सारी! आपण कसा काय मूर्खासारखा विश्वास ठेवला त्यांच्यावर? तिला काहीच सुचेना. आजूबाजूला चौकशी केली. पण काहीच कळेना. शेवटी निराश होऊन ती घराकडे परतली. संध्याकाळ खूपच वाईट गेली. आईला रात्रभर नीट झोप लागली नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळीच दाराची बेल वाजली. आईला वाटलं दूधवाला असेल. दार उघडलं तर दारात तो कल्हईवाला आणि यदुनाथ आणि लखलखणारी भांडी! यदुनाथ म्हणाला, ''काल आम्हांला पोलिसांनी पकडून चौकीत नेलं. रस्त्यात भट्टी का पेटवली? कुणाची परवानगी घेतली? धूर झाला सगळीकडे. तक्रार आलीय म्हणाले. खूप वेळ बसवून ठेवलं आम्हांला. बाबांनी गयावया केली. पोलिसांना दया आली. मग त्यांनीच आम्हांला एक नवी जागा सांगितली. लांब आहे ती. पण मोकळी आहे. वस्ती, रहदारी नाही तिथं जवळपास. मग आम्ही तिथं गेलो. भट्टी पेटवली. तुमच्या सगळ्या भांड्यांना कल्हई होईपर्यंत रात्र झाली. म्हणून मग आता आलो.''

कल्हईवाला म्हणाला, ''ताई आम्ही काल आलो नाही, म्हणून रागवू नका. काल लय बाका प्रसंग आला होता आमच्यावर. आमचा नाइलाज झाला हो.''

आई, बाळू, शमीला कल्हईवाल्याच्या आणि यदुनाथच्या लखलखीत, नितळ आणि नितांतसुंदर अंतर्मनाचं दर्शन सकाळी सकाळीच घडलं!

**–एकनाथ आव्हाड**
*eknathavhad23@gmail.com*



# स्येनु

“ए सिद्धया, आज तू जा की रे घोडे धुवायला!” सोम्या ओरडला.

“गप रहा रं! डोचकं उचकटू नको, दिसत नाय काय तोडे (मांसल प्राणी) पकडतोय.” मी केरसुणीच्या हिराने तोडे पकडत होतो. पुन्हा खाडीमध्ये पटापट खोदायला लागलो. मम्मी आली, “जा की सिद्धू , जा आज तेवढा. शंभर रुपये मिळतील की.” मी वैतागून उठलो.


रत्नसागर हॉटेल समुद्राशेजारी आहे. त्यांचे घोडे आहेत. एक घोडा माझा मोठा भाऊ संध्याकाळी समुद्रावर नेतो. पण आधी त्यांना धुवायला लागतं. आमची झोपडी समुद्राशेजारीच आहे. आम्ही घोड्यावरून फिरवलं की छोट्यांचे पन्नास तर मोठ्यांचे शंभर रुपये मिळतात. ते मालकाला द्यायचे. चार-पाच तास काम करून, घोडे धुऊन शंभर रुपये मिळतात. मग मी आठ दिवस त्यातल्या वीस रुपयांची मजा करतो. कारण बाकी पैसे मम्मीला द्यावे लागतात.

दुसऱ्या दिवशी मी वीस रुपये घेऊन नवानगरच्या बाजारात गेलो. पाच रुपयांची गरी (माशांचा गळ) घेतली. पाच रुपयांचा साव (नायलॉन दोरा) आणि पाच रुपयांची गुली (लोखंडी वजन). गेलो मासे पकडायला. आठवीत आहे ना मी, मम्मीला वाटतं की कॉलेजला गेलो पायजे मी, मासे पकडायला गेलो की मग ती सारखी तोंड वाजवते. आज मी पंधराच्यावर रेनव्या पकडल्या. मोठ्या खुशीत घरी गेलो. सिमरन नि पूजा माझ्या बहिणी, शेजारच्या रीयाना भाभी, रोझिना, अरमान, पाशा, अफसाना, यास्मीन, साहिल सगळे गर्दी करून उभे होते. मामा फणसोपवरून एक कुत्र्याचे पिल्लू घेऊन आला होता. “ए हटा ए!“ मी गर्दी बाजूला करून आत

गेलो. पिल्लू मस्त होतं. सिम्मी माझी बहीण त्याला जर्मन धातूच्या वाटीतून दूध देत होती. ते लपलप करून पित होतं. मला आवडलंच ते. किती गोड होतं ते. दूध-भाकरी कुस्करून मी त्याला देत असे. सोम्याने त्याचं नाव ठेवलं ''सोनू''.

सोनू आम्हांला शाळेला पोचवायला येई. न्यायला पण येई. शाळा सुटायच्या टायमावर तो हजर असे. मम्मी धुण्याभांड्याला जाई, तेव्हा सोनू मागून जाई. सगळ्या झोपडपट्टीला त्याचं कौतुक होतं. सोनूचा लळा आमच्या घरात सर्वांना लागला. मी खाडीवर गरी घेऊन निघालो की सोनू आलाच मागून. रात्री त्याची सोबत असे. बॅटरी मारून रात्री कुर्ल्या शिगेने पकडल्या की मी त्यांच्या नांग्या हातानेच तोडत असे. सोबत अरमान, पाशा पण यायचे. घोडे धुताना पण तो सोबत येई. सोनू आम्हांला हाक मारायचा. मम्मीसाठी हाक वेगळी, सोमूला हाक वेगळी, पूजा व सिम्मीला वेगळी. आणि मला तर खास ''भू..ऊं..ऑव'' अशी लाडाची हाक!

आज मी समुद्रावर गेलो होतो. घोडा फिरवला. कुणी तरुण मुले ट्रीपला आली होती. अचानक केकाटण्याचा आवाज आला. आवाज ओळखीचा वाटला. अरे.. हा सोनूचा आवाज. सोनूला दगड मारला होता कुणी. डोक्यावरच जखम झाली होती.



घोडा परत फिरवला. पाशाला सोमूला बोलवायला पाठवलं. मी सोनूकडे धावलो. तो ओरडत होता. मम्मी आली. तिने पोरांना शिव्या घातल्या. हळद चेपली तिनं. डॉक्टरकडे न्यायला आमच्यापाशी पैसा कुठं होता? मम्मीला रियाना भाभी बोलली की कुत्र्याचा डॉक्टर माणसांच्या डॉक्टरपेक्षा लय पैसे घेतो. मम्मी बोलली, "भाभी पोरांचं पोट भरेना, ह्याला डॉक्टरकडे कुठं नेऊ?" सोनू फिरत राहिला इकडे तिकडे, रडत राहिला, ओरडत राहिला, जखम वाढत गेली. लोक हाकावू लागले. हाड् हाड् करू लागले. सोनूने अन्नपाणी टाकलं होतं.

फणसोपवरून मामा आला एकदा सहज. सोनू असा पाहून त्याला धक्का बसला. तो मम्मीला बोलला, "आक्का अगं, झोपडपट्टीत खूप पोरं आहेत, सोनू चावला तर कठीण होईल. त्याला मारलं पाहिजे." जो प्रेमाने घेऊन आला त्यानेच विष आणलं. पेढ्यातून त्यानेच दिलं. मी ते देताना पाहू शकलो नाही. अंथरुणात मी पडून राहिलो.

सोनूने मरताना मम्मीला तीनदा आवाज दिला. रात्री दोन वाजता त्याने प्राण सोडला. पूजा-सिम्मी खूप रडत होत्या. बाप तर आम्हांला नव्हता. एक राखण करणारा होता- सोनू. तोही गेला. त्या दिवशी चूल पेटली नाही. त्याला खाडीकाठी आम्ही पुरले, मी त्याच्यासोबत माझी गरी, साव व गुलीही पुरली. सिम्मी वेडी, तिने अगरबत्ती लावली पुरल्यावर. सगळे घरी गेले. मी एकटाच बसून होतो. एक टोकदार दगड माझ्या डोक्यात कुणीतरी मारतंय असंच वाटलं मला.

**-डॉ. निधी सचिन पटवर्धन**
*nidheepatwardhan@gmail.com*

# पक्षी करतात घरटी



पक्षी बांधतात घरटी माझ्या भुजांवर
माझ्या खाद्यांवर, माझ्या गुडघ्यांमागे
माझ्या छातीमधोमध छोटुकले पक्षी

हंसांना वाटतं मी आहे झरा
वाकून वाकून पीतात माझं पाणी
मेंढ्या जातात माझ्यावर पाय देऊन

चिमण्या खातात माझ्या हातून
मुंग्यांना वाटतं मी आहे जमिन
माणसांच्या लेखी मी कुणीच नाही

**-Gloria Fuertes**
*(स्पॅनिश कवयित्री)*
**अनुवादक- नीना गोडबोले**
*ninagodbole@yahoo.com*




# पाककला स्पर्धा



सुट्टीत स्वयंपाकघरात लुडबूड करता ना? काहीतरी यम्मी, टेस्टी, इंटरेस्टिंग बनवता ना? शेफगिरी करणाऱ्या हौशी मुलांसाठी आपण **'छोटा शेफ पाककला स्पर्धा'** घेत आहोत. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आहे.

अहम् आवाम्
कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
**वयम्**
आपला सोबती

**स्वत:ला करता येणारी फक्त एक रेसिपी लिहा आणि 'वयम्'च्या पत्त्यावर पाठवा. रेसीपीचे नाव, त्यासाठी लागणारे साहित्य, प्रमाण, कृती यांसह नीट लिहून पाठवा. त्यासोबत जमल्यास तुमच्या रेसिपीचा तुमच्यासह एक फोटो काढून तोही पाठवा. या रेसिपी लिहून तुम्ही पत्राने किंवा इ-मेलद्वारे पाठवू शकता. कमीत कमी खर्चामध्ये पोस्टकार्डचा वापर करूनही रेसिपी पाठवू शकता.**

## रेसिपी पाठवण्याची अंतिम तारीख- ३० जून २०१८.

**तुम्ही पाठवलेल्या रेसिपींचे परीक्षण 'वयम्' मासिकात 'छोटा शेफ' सदर लिहिणारा 'मोठा शेफ' तुषारदादा करणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना छानसे बक्षीस तर मिळणार आहेच, शिवाय त्यांच्या रेसिपी 'वयम्'मध्ये प्रसिद्धसुद्धा होणार आहेत.**

**रेसिपी पाठवण्याचा पत्ता आहे-**
'वयम्' संपादकीय विभाग, न्यू वंदना को.ऑप. हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२,
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७०/७१/७२/७३
इमेल- info@wayam.in

# अब्बाचं वजन

**चुटकी** आज अंघोळीला अब्बाबरोबर गेली होती. अंघोळ करताना अब्बा छान छान गाणी गातो. ती गाणी तिला खूप आवडत. अंघोळ करताना ती अब्बाला 'ओ वाला गा, बहारों फूल बरसावो...' अशी फर्माइश करायची. अब्बा न कुरकुरता गायचा. त्याच्या घोगऱ्या आवाजातही एक गोडवा होता. चुटकीला तो जास्त आवडायचा. तसं तर अब्बाला रोज रोज तिला अंघोळ घालणं शक्य नव्हतं. पण कधी वेळ असेल तर त्यांचा अंघोळीचा कार्यक्रम तासभर चाले. मग भरपेट नाश्ता करून चुटकी खेळायला जायची. शेजारच्या दादी अंघोळ घालत तिला. पण, आताशा ती स्वत: अंघोळ करायला शिकलीय. टीव्हीतल्या जाहिरातीसारखी ती मनमुराद, तासभर अंघोळ करत राहायची. अब्बा खूप हसायचा. शेजारची दादी तक्रार करायची.

आज अब्बा निवांत होता. चुटकीची अंघोळ झाली. अंग पुसून झालं. पण बाहेर जाताना उघडी कशी जाणार? ''अरे, मी माझा फ्रॉक नाही आणला,'' चुटकी कपाळावर हात मारत म्हणाली.

''रेहने दे. ये डाल के जा.'' असं म्हणत अब्बाने तिला आपला टी शर्ट घालायला दिला. मोठं पोतंच जणू! माशाचा वास येत होता त्याला. पण चुटकीला तो वास घाण वाटला नाही. नावाडी असलेला तिचा अब्बा खूप मेहनत करतो. हा मेहनतीचा वास आहे, असं ती मनातल्या मनात म्हणाली.

अगडबंब देहाच्या अब्बाचा शर्टही तसाच होता- अगडबंब! तो भला मोठा टी-शर्ट घालून ती आत आली. पायरी चढताना शर्ट पायात अडकून ती पडणारच होती, पण तिने स्वत:ला सावरलं.

''अब्बा, लय जाड झालाय...!'' तिच्या मनात विचार आला.

अब्बाच्या वजनाचं काय करावं याचाच तिला आता घोर पडला होता. इतक्यात अब्बा अंघोळ करून आला. टी-शर्ट नसल्याने तो उघडाच आला होता. त्याच्या पहाडासारख्या देहाकडे बघून चुटकीने कपाळाला हातच लावला.

चुटकी ही तिच्या अब्बाची लाडकी पोर. चुटकी आणि अब्बा यांचं नातं घट्ट होतं. अथांग सागरातल्या एका थेंबानं अवचित, अलगद एखाद्या शिंपल्यात जाऊन बसावं आणि त्याचा मोती व्हावा, तशी चुटकी अब्बाच्या जीवनात आली आणि अमूल्य मोती होऊन गेली.
अब्बाच्या सुरक्षित, प्रेमळ कुशीत चुटकी वाढू लागली...



आपल्याला अब्बा आजच का एवढा जाड वाटला? आधीपासून तो जाडच आहे की. या विचाराने तिला हसायला आलं. आजवर आपण कधी त्याचा टी-शर्ट घातला नव्हता ना... मग कसं कळणार? अब्बाला वजन कमी करायला लावायचं, असं मनाशी पक्कं ठरवत तिने फ्रॉक घातला. आज नाश्त्याला अंडा-भुर्जी आणि पाव होता. तिचा आवडता नाश्ता. अब्बा भुर्जी फार भारी बनवतो. शेजारच्या चाचीलाही तशी जमत नाही.

''अब्बा, तेरा वजन बहुत बढ गया है. कम करना पडेगा.'' असं चुटकीने म्हणताच अब्बा नुसतं ''हम्म'' एवढंच म्हणाला. पण चुटकी थोडीच गप्प बसणार होती. तिने पहिल्यांदा त्यांच्या मोहल्ल्यातल्या डॉक्टर-चाचाकडे मोर्चा वळवला. तिने अब्बाच्या वजनाविषयी त्यांना सांगितलं. डॉक्टर हसले. कारण ते मुसाला सांगून थकले होते. पण त्याने कधीच त्यांचं ऐकलं नाही. आपली नाव, काम आणि चुटकी- एवढंच त्याचं जीवन होतं. त्यातच तो खूश होता.

''मै बोलता मुसा को. तू जा,'' असं डॉक्टर म्हणाले, पण चुटकी तिथून हलेना. शेवटी डॉक्टरांनी तिला एक 'डाएट चार्ट' दिला. जेवण किती, कसं करायचं? कुठल्यावेळी करायचं? ती ''शुक्रिया!'' असं हसून म्हणाली.

तिने तो चार्ट अब्बाला दिसेल असा लावला. तिने चार्ट लावून अब्बाला सांगितलं- ''इसमें जैसा लिखेला है, वैसा करने का!''

अब्बा जोरात हसायला लागला. चुटकी परेशान झाली. ''का बरं हसला अब्बा?''

''ये तो इंग्रजी में है, मुजे नै आती.'' आता चुटकीही हसत होती. आपल्या हे डोक्यात कसं आलं नाही? तिने तो चार्ट कसाबसा काढून घेतला. एक कोरा कागद आणून शेजारच्या फातिमा दीदीला दिला.

''ये हिंदी में करके दो दीदी.'' फातिमा दीदीने तिला शक्य तेवढं लिहून दिलं.

आता नवीन चार्ट आला. अब्बाचं डाएट सुरू झालं. आपण लवकर इंग्रजी शिकून घ्यायला हवं, असं तिला वाटलं.

मुसाला हे जड जात होतं. तो प्रचंड मेहनत करायचा. तसंच त्याला खावं लागायचं. कधी कधी समुद्रात दोन दोन, तीन तीन दिवस जावं लागायचं. तेव्हाही असंच काहीसं होई. पण आपल्या चुटकीसाठी तो हे सर्व करायचा. एकही शब्द न बोलता.

अब्बा एकदा चुटकीला पैगंबरांची कहाणी सांगत होता. चुटकी मांडीवर झोपली होती. ती कथा मुहम्मद पैगंबर यांची होती. त्यांनी गुलामगिरी नष्ट केली. एका गुलामाला आपला मुलगा मानलं. त्याकाळी मुलींना जगण्याचा अधिकार मिळवून दिला. चुटकी काळजीपूर्वक ऐकत होती.

''अब्बू, पैगंबर म्हणजे काय?''

''पैगंबर म्हणजे देवाचा संदेशवाहक. एक सच्चा व प्रामाणिक माणूस, जो सर्वांचं कल्याण करतो.'' चुटकी कान देऊन ऐकत होती. आपल्या अब्बाला सर्व माहीत आहे, याचा तिला नेहमीच अभिमान वाटे.

माझा अब्बापण एक सच्चा आणि प्रामाणिक माणूस आहे. मग तोही पैगंबर आहे का? ती याच विचारात गढून गेली.

ऐकता ऐकता ती तिथंच झोपी गेली. अब्बाने तिला नीट झोपवलं. मुसाला नाव घेऊन समुद्रात जायचं होतं. तो दोन तीन दिवस परत येणार नव्हता. त्याने तयारी केली. शेजारच्या दादीला सांगून तो निघून गेला.

जाताना चुटकीच्या मस्तकाची पापी घेऊन गेला. क्षणभर तिच्याकडे टक लावून पाहिलं आणि झरकन बाहेर पडला.

नावेवर तो खूप काम करत होता. जाळं ओढणं, मासे टोपल्यात भरणं, त्यातून छाटून ते शीत पेटीत भरणं. त्याचे साथीदार त्याला मदत करत होते. दिवस बघता बघता टळू लागला. आपल्या मालकाने सकाळी फक्त थोडं खाल्लंय, त्याला भूक कशी काय लागली नाही- असा प्रश्न सर्वांनाच पडला होता.

रात्र झाली. सगळे जेवायला बसले. पण मुसा जेवला नाही. त्याने दोन सफरचंद खाल्ली. सगळ्यांनी त्याला आग्रह केला. पण त्याने दुसरं काहीही खाल्लं नाही. चुटकीमुळे वजन कमी करण्याचं आपल्या मालकाने मनावर घेतलंय हे सगळ्यांनी ओळखलं. लोक मुसाची चेष्टा करत असत, पण मुसा हटला नाही.

मुसा रात्री आकाशातले तारे पाहत होता. त्याला त्याच्या चुटकीची खूप आठवण येत होती. आपलं वजन कमी व्हावं यासाठी पोर किती झटते आहे! किती छोटासा जीव पण काळजी अगदी मोठ्या शहाण्या माणसासारखी. शेवटी मुसाला तरी तिच्याशिवाय कोण होतं या जगात? हा समुद्र, वादळं, ही मोठी नाव, सहकारी आणि या सगळ्या कोलाहलापासून दूर एक निवांत, एक सुखाची, आनंदी जागा म्हणजे माझी चुटकी... असा विचार करता करता त्याच्या डोळ्यांच्या कोपऱ्यात आसवं ओघळू लागली. त्याने पटकन ती पुसून टाकली. पहाट होऊ लागली होती. मंद गारवा वाऱ्यासोबत अंगाला स्पर्श करत होता. उत्तरेचा तारा ठळक दिसत होता. मुसाच्या चेहऱ्यावर एक मंद हसू होतं.

दिवस उगवताच सगळे कामाला लागले. मुसाला कडाडून भूक लागली होती. पण चुटकीची ताकीद आठवली आणि त्याने जेवणाचा विचार रद्द केला. तो काम करत राहिला. ऊन वाढू लागलं तसा मुसा अस्वस्थ होऊ लागला. त्याचा हात थरथरू लागला. आपल्या मालकाला नेमकं काय होतंय हे कळायच्या आधीच मुसा भोवळ येऊन खाली कोसळला. सहकारी गडबडले. गांगरून गेले. त्याला पटकन पाणी पाजून सावलीत आणलं. त्याला थोडा आराम मिळाला. सहकाऱ्यांनी त्याला खायला घातलं. सगळ्या सहकाऱ्यांनी ठरवून नाव परत किनाऱ्याकडे फिरवली. मुसाचं कुणीच ऐकलं नाही, त्याला डॉक्टरांकडे आणलं.

'उपाशी राहिल्याने चक्कर आली.' डॉक्टरांनी निदान केलं.

चुटकीला कुणी काहीही हे सांगू नका, असा दम मुसाने सर्वांना दिला. पण कुणी सांगण्याची वेळ आलीच नाही. चुटकीला कुणीतरी सांगितलं की, अब्बाला दवाखान्यात नेलंय! ती तडक दवाखान्यात येऊन पोचली होती. डॉक्टर काय बोलले, हे तिने ऐकलं होतं.

''मुजे मालूम है, तू मेरी वजह से बिमार हुआ.'' असं म्हणून ती रडू लागली. मुसा तिची समजूत घालत होता. मात्र ती काही ऐकत नव्हती.

''अब्बा, तू जसा आहेस तसा चांगला आहेस. जाडजूड अब्बा चालेल मला. फक्त थोडा थोडा व्यायाम कर. जेवण बंद नको करूस. नाहीतर मीही जेवणार नाही,'' असं म्हणून ती अब्बाच्या गळ्यात पडली. डॉक्टरसह सगळेच हसत होते. चुटकीचा अब्बावर आणि अब्बाचा चुटकीवर किती जीव आहे, हे सगळेचजण पाहत होते.

मुसाने व्यायाम करायचं कबूल केलं आणि चुटकी त्याच्या पोटावर पहुडली. चुटकीच्या डोक्यावरून हात फिरवताना त्याच्या चेहऱ्यावर एक मंद हसू होतं !

**( क्रमशः )**

**-फारूक एस.काझी**
*farukskazi82@gmail.com*

जगभरात गाजलेल्या चित्रकारांची आणि त्यांच्या चित्रांची थोडक्यात ओळख करून देणारे हे सदर लिहिले आहे राष्ट्रीय पारितोषिक विजेते ज्येष्ठ चित्रकार दत्तात्रय पाडेकर यांनी. हे चित्र पाहा, त्याचा आस्वाद घ्या. त्या त्या चित्रकाराची, त्याच्या चित्रशैलीची आणखी ओळख तुम्ही इंटरनेटच्या साह्याने करून घ्या.

# सुंदर रचना आणि रंगसंगती

**मासे** पकडणाऱ्या महिलेचे हे सुंदर चित्र प्रसिद्ध भारतीय चित्रकार ए. ए. आलमेलकर (जन्म- १९२०, मृत्यू- १९८२)यांचे आहे. हे श्रमजीवी स्त्रीचे आहे, हे चित्र पाहिल्याबरोबर सहज लक्षात येते. काटक अंगकाठी आणि अल्पवस्त्रामध्ये असणारी ही स्त्री जाळ्यातून मासे पकडत आहे. तिच्या टोपीवरून आणि चेहऱ्याच्या ठेवणीवरून, एकूण वेशभूषेवरून ती मलेशियन महिला असावी असे वाटते. तिच्या कमरेला मासे ठेवण्यासाठी वेताची टोपली लटकवलेली आहे. मासे पकडण्याचे जाळे पण वेगळ्या प्रकारचे आहे. चित्र पाहिल्याबरोबर आपले प्रथम लक्ष तिच्या चेहऱ्याकडे जाते. चेहऱ्यावरून केसांवर व केसांवरून खाली टोपलीकडे लक्ष जाते. तेथून हाताकडे लक्ष जाते. तिने हातात पकडलेला मासा आणि जाळ्यात अडकलेले मासे लक्ष वेधून घेतात. त्याच जाळ्याचा काही भाग दूरवर पसरलेला दिसतो. पाठीमागून दृष्टी फिरून पुन्हा डोक्यावरून मुख्य चेहऱ्याकडे येते. हे सुंदर चित्र आलमेलकर यांनी वैशिष्ट्यपूर्ण भारतीय चित्रशैलीमध्ये चितारलेले आहे. हे चित्र अपारदर्शक जलरंगात केले आहे. विषयानुरूप सुंदर निळ्या रंगांच्या विविध छटांची रंगसंगती केली आहे. आणि सपाट रंग न वापरता साधारण पोताचा वापर केल्यामुळे चित्रामध्ये कष्टकरी ग्रामीण जीवनाचा भाव प्रकट होतो. चित्रकार आलमेलकर यांच्या चित्रातील रंग, रेषा, आकार, रचना, अलंकरण यांचे सौंदर्य याही चित्रात प्रतीत होते.

अब्दुल रहमान अप्पाभाई आलमेलकर यांचा जन्म १० ऑक्टोबर १९२० रोजी अहमदाबाद येथे झाला. लहानपणापासून त्यांना चित्रकलेची आवड होती. त्यामुळे ते चित्रकलेचे पुढील शिक्षण घेण्यासाठी मुंबईला आले. मुंबईतील 'ऑपेरा हाऊस' जवळच्या नूतन कला मंदिरात १९३५ ते १९४० या काळात दंडवतीमठ यांच्याकडे ते शिकले. पुढे त्यांनी 'जे. जे. स्कूल ऑफ आर्ट'मध्ये प्रवेश घेतला व १९४८ मध्ये त्यांनी



पेंटिंगमधली पदविका प्राप्त केली. सुरुवातीच्या काळात त्यांच्या चित्रांवर लँगहॅमर व बेंद्रे यांच्या निसर्गचित्रण शैलीचा पराभव होता, परंतु नंतरच्या काळात त्यांनी स्वत:ची अशी वैशिष्ट्यपूर्ण शैली निर्माण केली.

त्यांना बॉम्बे आर्ट सोसायटी, आर्ट सोसायटी ऑफ इंडिया, ललित कला अकादमी यांसारख्या अनेक संस्थांची पारितोषिके मिळाली. त्यांना २० सुवर्णपदके, २४ रौप्यपदके व अन्य रोख रकमेचे पुरस्कार मिळाले. त्यांची एकूण ४० एकल प्रदर्शने झाली. त्यांची चित्रे व लेख धर्मयुग, किर्लोस्कर, मौज, मनोहर अशा अनेक मासिकांतून प्रसिद्ध झाले. त्यांनी मुख्यत्वे ग्रामीण व आदिवासी जीवनावरील स्त्री-पुरुषांची चित्रं काढली. रचनेतील वैविध्य, आधुनिकता आणि विविध वस्तूंच्या वापरातून निर्माण होणारा पोत यातून ते त्यांचे चित्र निर्माण करीत. आलमेलकरांनी तैलरंगात चित्रं रंगविली असली तरी अपारदर्शक जलरंग हे त्यांचं आवडतं माध्यम होतं. नाविन्यपूर्ण, अलंकरणात्मक भारतीय शैलीचे चित्रकार म्हणून आलमेलकर यांचं नाव मोठं आहे.


**–दत्तात्रय त. पाडेकर**

*dattapadekar@hotmail.com*

मला प्रवास करायला आवडतो, ज्या प्रांतात जाते तिथली घरं, हा माझा आवडीचा विषय, काही घरं मी इथे दिली आहेत...तू पण प्रवास करत असशीलच ना!... तू पाहिलेली घरं काढ आणि सगळी घरं तुझ्या आवडत्या रंगात रंगव.

**–शुभांगी चेतन**

*shubhachetan@gmail.com*



# Paper Helicopter



**Materials used :-**

- Any colour tinted paper
- U-pins • Scissors

**Step 1**- Take any colour tinted sheet and cut a 7cm x 3cm strip.



**Step 2**- Cut 3 cm from top of the strip vertically.



**Step 3**- Cut left and right of strip horizontally less than half cm, below the previous vertical cut.




**Step 4**- Fold bottom left and right flaps as shown and hook the bottom with a u-pin to lock.



**Step 5**- From the top, fold the left strip towards you, and fold the right strip on opposite side making a 'Y' shape from side angle.

Your paper helicopter is ready, throw from a height of more than 10 feet downwards and enjoy seeing go round and round.



**-Saurhin Parikh,**
*Mob- 9594950379*
*saurhin@gmail.com*

रहस्यकथा

# रिव्हर्स टेक्नॉलॉजी

**सिल्वाना** गावातील एका उंच टेकडीवर डॉ. सॅम बर्डी यांचा बंगला आहे. त्यांचा बंगला म्हणजे एक महाकाय प्रयोगशाळाच आहे. ते आपल्या बंगल्यात कुणालाच येऊ देत नाहीत. डॉ. बर्डी खूप वेळा संशोधनाच्या निमित्ताने भारताबाहेरच असतात.

एप्रिल महिन्यातली गोष्ट आहे. डॉ. बर्डी नुकतेच गावात परतत होते. गावात लोकांचा मोठा जमाव जमला होता. बर्डींना पाहताच सगळे गावकरी धावतच त्यांच्याकडे आले. गावातले सरपंच हात जोडून म्हणाले, ''डॉक्टरसाहेब, आता कृपया आमचा प्रश्न सोडवा.''

बर्डींनी विचारले, ''काय प्रश्न आहे?''

''जंगलातला एक वाघ मोकाट सुटला आहे. संपूर्ण गावात रात्रभर लोक आळीपाळीने गस्त घालत आहेत. पण आज सकाळी कमालच झाली. सकाळी सकाळी वाघाने आमच्या घरावरच हल्ला केला. अंगणात माझा लहान नातू खेळत होता, वाघ त्यालाच उचलून घेऊन जाणार होता. पण हे कुत्र्याच्या (टारझन) लक्षात आलं. कुत्र्याने न भिता, जोरजोरात भुंकत वाघावर झडप घातली. त्याचा आवाज ऐकून आम्ही सारे बाहेर आलो. मी दरवाजातूनच हातातला लोटा वाघाला फेकून मारला. या सर्व प्रकाराने वाघ बिचकला. पण जाताजाता त्याने टारझनचा लचका तोडला. हा बिचारा इमानदार टारझन आता मरायला टेकला आहे. काय करावं कळत नाही. डॉक्टरसाहेब, आता तुम्हीच मदत करा.''

डॉ. बर्डी विचार करत म्हणाले, ''मला कळलं नाही. मी तुम्हांला नक्की काय मदत करायला पाहिजे ते सांगा.''

सरपंच डोकं खाजवत म्हणाले, ''या आमच्या टारझन कुत्र्याला वाचवा. मला वाटत नाही, आता तो फार वेळ जगेल असं. या वाघाचा बंदोबस्त आम्ही करू. त्याची आम्हांला काळजी नाही. आज संध्याकाळपर्यंत सहा पिंजरे गावात येतील. पण या आमच्या शूरवीर टारझनला वाचवा. तुमच्यासारखे महान डॉक्टरच हे काम करू शकतात.''

बर्डी फक्त हसले. मग थोडा विचार करून म्हणाले, ''ठीक आहे. मी तुमचं काम करीन. पण मी सांगितलेलं तुम्हांला ऐकावं लागेल, हे कबूल असेल तरच..''

सगळे एका सुरात म्हणाले, ''हो..हो...''

डॉ.बर्डी यांनी टारझनची अवस्था पाहिली. तो खरंच मरायला टेकला होता.

त्यांनी लगेचच टारझनच्या रक्ताचे काही नमुने गोळा केले. त्याच्या मानेजवळचे केस



कापून एका पुडीत बांधून घेतले. सरपंचांच्या खांद्यावर हात ठेवत बर्डी म्हणाले, ''हा टारझन फार तर तासाभराचा सोबती आहे. वाघाने त्याच्या गळ्याकडेच चावा घेतल्याने तिथून खूपच रक्तस्त्राव झाला आहे. मी एक प्रयोग करून पाहणार आहे. त्यात थोडा धोका आहे. पण जर का हा प्रयोग यशस्वी झाला तर तुमचा टारझन तुम्हांला परत मिळू शकेल.''

बर्डींचं बोलणं थांबवत, सरपंच अत्यंत उत्साहाने म्हणाले, ''आमचा टारझन आम्हांला परत हवाय. माझ्या नातवाचा जीव वाचवलाय त्याने. आमच्यावर त्याचे खूप उपकार आहेत. कितीही पैसे खर्च करावे लागले तरी ते कमीच आहेत.''

बर्डी म्हणाले, ''टारझन वाचण्यासाठी पैशाची नव्हे तर धीराची गरज आहे. आणि मुख्य म्हणजे, मरणासन्न टारझनला परत आणण्यासाठी, मी जे करणार आहे तो प्रयोग आहे. प्रयोग यशस्वी होऊ शकतो किंवा अयशस्वी. या दोन्ही शक्यतांचा विचार करा आणि मगच काय तो निर्णय घ्या.''

सरपंचांनी भीत भीत विचारलं, ''डॉक्टर, आम्ही काय केलं पाहिजे ते तरी सांगा.''

''हा एक क्रांतिकारी प्रयोग आहे. हा जर यशस्वी झाला तर संपूर्ण जगाचं चित्रं बदलून जाणार आहे. आजपर्यंत जगात 'असं होईल' असं कुणाला वाटलं नाही.. तसं होणार आहे. आणि तेही तुमच्या टारझनच्या बाबतच होणार आहे. टारझन मरायला टेकला आहे, तर त्याला मारा. मी त्याला जिवंत करतो... आता मारा लगेच त्याला.''

सरपंच हात जोडत म्हणाले, ''डॉक्टरसाहेब, तुम्हांला वेड लागलंय, की मला? अहो त्या इमानदार कुत्र्याला मारायचं? त्याने माझ्या नातवाला वाचवलं, त्याला मारायचं? त्याचे असे पांग फेडायचे? माझ्याच्याने असं नाही होणार.'' सरपंच रडू लागले.

डॉक्टर बर्डी शांतपणे म्हणाले, ''मी तुम्हांला आधीच सांगितलं होतं, जर तुम्हांला तुमचा टारझन परत हवा असेल तर मी सांगतो ते ऐकावंच लागेल. एक लक्षात घ्या. तसाही आता थोड्याच वेळात टारझन मरणारच आहे. पण जर आत्ताच तुम्ही त्याला मारलंत आणि त्याची शेपटी मला आणून दिलीत तर मी माझा प्रयोग लगेच सुरू करीन. लक्षात घ्या, त्याला मारणं आणि त्याची शेपटी कापणं हे एकाचवेळी व्हायला पाहिजे, तर आपला प्रयोग यशस्वी होण्याचे चान्सेस अधिक आहेत. तुम्हांला टारझन परत हवा असेल तर काय करायचं हे आता तुम्ही ठरवा. मी चाललो.'' डॉक्टर गाडीत बसून निघून गेले.

सगळ्या गावापुढे वेगळाच पेच पडला. काय करावं कळेना. काही लोकांना डॉक्टरांचं म्हणणं पटलं होतं, पण टारझनला मारायला मन धजत नव्हतं. सरपंचही गोंधळले होते. त्यांच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा लागल्या होत्या. सगळे टारझनच्या भोवती जमले. टारझनचे डोळे बंद झाले होते. त्याचे शेवटचे श्वास सुरू होते.

इतक्यात...

सरपंचांचा मुलगा घरातून दोन कोयते घेऊन बाहेर आला आणि कुणाला काही कळण्याच्या आतच त्याने एक कोयता टारझनच्या मानेवर तर दुसरा त्याच्या शेपटीवर असा काही मारला की, डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणेच सारे झाले. शेपटी पिशवीत टाकून तो डॉक्टरांकडे रवाना झाला. गावकरी आणि सरपंच फक्त तोंडाचा 'ऑ' करून पाहातच राहिले. डॉक्टर वाटच पाहात होते. ते म्हणाले, ''६९ तासांनी ये आणि कुत्रा घेऊन जा.''

बर्डींनी रक्ताचा नमुना घेतलाच होता. त्यांच्याकडे असणाऱ्या रक्तात थोडा फेरफार केला. लवकर गुण येण्यासाठी त्यात मेटॉसिनोमॉकक्सिनी आणि सोडियम फॉस्फोसीटेट हे ३.९ : २९.७८ या

प्रमाणात मिसळलं. आणि थोडंफार टारझनच्या रक्तासारखंच २.३९ लिटर रक्त तयार केलं. केसाचा नमुना होताच. केसांसाठी त्यांनी हायड्रोकेरोटिन आणि नायट्रो डिक्लॅम बेंझाइन तयार ठेवलं.

फेराइट कोटेड पण कार्बन इन्सुलेडेट मोठी पेटी तयारच होती. त्या पेटीत त्यांनी कुत्र्याचा मोल्ड ठेवला.

शेपटीच्या ठिकाणी शेपटी ठेवली. मोल्डमधे नव्याने तयार केले २.३९ लिटर रक्त ओतलं. त्यावर हायड्रोकेरोटिन आणि नायट्रो डिक्लॅम बेंझाइनची फवारणी केली.

डॉक्टरांनी याक, रानटी झेब्रे आणि कोवालाच्या चरबीपासून 'याकोझे' नावाचा एक बुळबुळीत पेस्टसारखा पदार्थ तयार केला होता. त्यामधे त्यांनी अनेक रसायनं पण मिसळली होती. ९.३७ किलो याकोझे घेऊन त्याला त्यांनी गॅमा १९ आणि हॅग्झाओमेगा किरणांचे ३.९ सेकंदासाठी रेडिएशन दिले. हा याकोझे त्यांनी मोल्डमधे भरला. ही पेटी सेन्सोडॉपलींग एमिटरच्या समोर ठेवली. त्याच्या फ्रिक्वेन्सीज सेट केल्या. आणि बंद पेटीच्या चारही बाजूंनी गॅमानायट्रो, हॅग्झाओमेगा, मॅट्रिकअल्फा आणि क्वाड्रासेंट्रीक न्यट्रॉन्स किरणांची वर्तुळे फिरू लागली. पेटीच्या वरच्या बाजूने ऑक्सी डायनामाझेशन सुरू होतं. पेटीच्या आतलं रासायनिक स्प्रिंकलर्स आणि सेन्सर्स ॲक्टिव्हेट झाले होते. पेटीच्या आत काय घडत आहे, ते समोरच्या स्क्रीनवर दिसत होतं..

आणि.. डॉक्टर श्वास रोखून पाहात होते. सलग ९ तास डॉक्टर स्क्रीनसमोर बसून होते. पण काहीच घडत नव्हतं. थोडासा चहा घ्यावा म्हणून ते उठणारच होते, इतक्यात पेटीतील शेपटी किंचित थरथरल्यासारखी वाटली. डॉक्टरांनी लगेचच सेन्सोडॉपलींग एमिटरला नवीन प्रोग्रॅम फीड केला. चार किरणांची तीव्रता तर वाढवलीच, पण त्यांच्या तरंगलांबींचे कॉम्बिनेशन बदलले.

तासाभरात फरक जाणवू लागला. याकोझेचे मांसात रूपांतर होऊ लागले होते. मांसावर कातडीचा थर साचू लागला होता आणि रासायनिक स्प्रिंकलर्समुळे कातडीवर केस दिसू लागले होते. संपूर्ण एक दिवस संपला. आता पेटीतल्या कुत्र्याला आकार आला होता. त्याच्या अंगात अतिशय कमी दाबाने रक्त फिरू लागलं होतं. त्याची नखं वाढू लागली होती. पण अजून त्याला डोळा आला नव्हता.

आता डॉक्टरांनी धोका पत्करायचं ठरवलं.

पेटीच्या वरच्या बाजूने जे ऑक्सीडायनामाझेशन सुरू होतं तिथूनच लेझर ट्रीटमेंट देणे गरजेचे होते. कारण डोळा येण्यासाठी याकोझे वर १३.७८ सेप्टो पॉवरचे लेझर बीम्स किमान ३.२९ सेकंद तरी सोडायला हवेत. इतके तीव्र लेझर बीम्स जर याकोझेवर पडले, तरच त्यात छेद निर्माण होईल आणि डोळ्यांसाठी जागा मोकळी होईल. पण यावेळी ऑक्सीडायनामाझेशन मात्र बंद ठेवावं लागणार होतं. कारण लेझर बीम्स आणि ऑक्सीडायनामाझेशन एकाचवेळी सुरू राहिलं तर स्फोटच झाला असता. आणि ऑक्सीडायनामाझेशन थांबवलं तर आतल्या कुत्र्याला होणारा कृत्रिम ऑक्सिजनचा पुरवठा बंदच झाला असता.

नेमकं काय करावं, डॉक्टरांना कळेना. आता कुठे यश दिसू लागले असताना, या जागतिक प्रयोगाचे बारा वाजतात की काय असं त्यांना वाटू लागलं. डॉक्टर भलतेच बेचैन झाले. घोटभर चहा घ्यावा म्हणून ते किचनमधे गेले. गरम पाण्यात त्यांनी चहाची पुडी टाकली. चहाच्या कपाकडे पाहात डीप डीप करत ते चहा पिणारच होते, इतक्यात पाण्यात विरघळणाऱ्या चहाकडे पाहून त्यांना एक कल्पना सुचली. पेटीतल्या

एका स्प्रिंकलरमधून माइल्ड लिक्विड ऑक्सिजन फवारायला सुरुवात केली आणि त्याचवेळी वरतून लेझर बीम्स शूट केले. त्याचक्षणी याकोझेमधून लाल टपोरा डोळा बाहेर आला. सुमारे तासाभरातच हळूहळू उघडझाप करू लागला.

डॉक्टरांचा आनंद गगनात मावेना.

दुसऱ्याच दिवशी कुत्रा पेटीतून उठण्याचा प्रयत्न करू लागला. कारण आता त्याचा रक्तदाब नॉर्मलला आला होता आणि बहुधा म्हणूनच त्याला भूक लागली असावी.

बर्डी सावध झाले. पेटीतल्या स्प्रिंकलर्समधून त्याच्यावर मॉर्फीनची फवारणी केली आणि कुत्रा बेशुद्ध झाला.

आता शेवटचे दोन तास शिल्लक होते. इतक्यात त्यांना बाहेर खूप गडबडगोंधळ सुरू असल्याचा आवाज आला. बर्डी धावतच बाहेर आले. सरपंच, त्यांचा मुलगा आणि सारे गावकरी उत्सुकतेपोटी बाहेर जमले होते. सरपंचांनी टारझनच्या गळ्यातील जुना पट्टा तर आणला होताच, पण टारझनच्या आवडीचे भाजलेले मांसाचे तुकडे पण आणले होते. बर्डींनी सगळ्यांना थोडावेळ शांत राहण्याची खूण केली.

सर्व चाचण्या पूर्ण झाल्यानंतर ती फेराइट कोटेड कार्बन इन्सुलेडेट मोठी पेटी डॉक्टरांनी ट्रॉलीवरून बाहेर आणली. सगळे गावकरी दचकून उभे राहिले.

६९ तास संपायला ४८ सेकंद शिल्लक असताना डॉक्टर बर्डींनी काऊंटडाऊन सुरू केला. ४८, ४७, ४६, ४५, ४४, ४३.. आणि शून्य असं म्हणून डॉक्टरांनी रिमोटवरचं बटण दाबलं. फेराइट कोटेड कार्बन इन्सुलेडेट पेटीचं झाकण सावकाश उघडलं गेलं. आत काय आहे? हे पाहण्यासाठी गावकरी दोन पावलं पुढे आले..

आणि त्याचक्षणी.. पेटीतून एका भयानक कुत्र्याने त्यांच्या अंगावर उडी मारली. त्या कुत्र्याचा मोठा विचित्र जबडा, अणकुचीदार मोठे सुळे, लाळ गळणारी काळपट लाल जीभ आणि लाल खुनशी डोळे पाहताच गावकऱ्यांची पळापळ सुरू झाली.

त्या कुत्र्याने अचानक सरपंचांच्या अंगावर झेप घेतली. या अनपेक्षित हल्ल्याने सरपंच जमिनीवर पडले. कुत्र्याने आपले पुढचे दोन पाय सरपंचांच्या छातीवर ठेवले आणि आपलं उघडलेलं तोंड सरपंचांच्या गळ्याकडे नेलं.

आता सगळेच श्वास रोखून पाहू लागले. काही गावकरी कुत्र्याला मारायला धावले, तर काही लोकांनी त्याला मारण्यासाठी हातात दगड घेतले. पण डॉक्टरांनी सगळ्यांना खूण करून थांबवलं.

सरपंचांना मरण डोळ्यांसमोर दिसू लागलं. आपण त्याला मारलं, आता तो आपल्याला मारणार. आपणही आता त्याच्यासारखेच तडफडत मरणार, या विचाराने त्यांच्या तोंडून शब्दच फुटेना.

इतक्यात..

सरपंचांचा मुलगा जोरात ओरडला,

''टाऽऽऽरझन इकडेऽऽऽ ये.''

आणि चमत्कार झाल्याप्रमाणे टारझन गर्रकन वळला. त्याने फक्त त्याच्याकडे पाहिलं. मग त्याने सरपंचांच्या मानेचा, गळ्याचा वास घेतला आणि तो सरपंचांचे पाय चाटू लागला. पुढच्याच क्षणी सरपंचांनी या नवीन टारझनला आपल्या कुशीत घेतलं आणि सोबत आणलेला खाऊ त्याला भरवू लागले. हे दृश्य पाहणारे सारेच आनंदाने रोमांचित झाले.

तर.. आता हाच प्रयोग माणसांवर कसा करावा? याचा विचार डॉक्टर सॅम बर्डी मनातल्या मनात करू लागले.

**–राजीव तांबे**
*me@rajivtambe.com*
*www.rajivtambe.com*

# कॉम्प्युटरने व्यापलं जग!



**कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय? कॉम्प्युटर विचार करू शकतो का? माणसांची कोणकोणती कामं रोबो करू शकेल?**

**आज** कॉम्प्युटरनं आपलं अवघं जग व्यापून टाकलं आहे. महानगरातच नाही, तर लहान गावांत राहणाऱ्यांकडेही आता स्मार्ट फोन असतात आणि ते सगळेच 'दुनिया मेरे मुठ्ठी में' म्हणजे काय याचा अनुभव घेत असतात. आपण कुठंही असलो तरीसुद्धा जगातल्या कोणत्याही भागातल्या आपल्या मित्राशी, मैत्रिणीशी, नातेवाईकांशी आपण क्षणात संपर्क साधू शकतो, बोलू शकतो. एखाद्या गोष्टीबाबत माहिती हवी असेल तर आपल्याच हातातल्या स्मार्ट फोनवर इंटरनेटच्या मदतीनं आपण आपल्याला हवी ती माहिती मिळवू शकतो. अर्थात ती माहिती परिपूर्ण असेलच असं नाही. मात्र प्राथमिक स्वरूपाची किंवा आपल्याला हव्या त्या विषयाची तोंडओळख होईल किंवा त्याची काहीशी कल्पना येईल इतपत माहिती तर आपल्याला आपल्या स्मार्ट फोनवर मिळू शकते. आपण आपल्या घरीच असलो किंवा शाळेत/कॉलेजात असलो किवा ऑफिसात असलो तर आपल्या टेबलावरचा कॉम्प्युटर सुरू करून इंटरनेटची मदत घेऊ शकतो. रेल्वे गाडी, बस, विमान यांची तिकिटं काढू शकतो. दोन ठिकाणांमधलं अंतर जाणून घेऊ शकतो. आपल्या शहरातलं हवामान आज कसं आहे आणि आपला मित्र किंवा मैत्रीण राहात असलेल्या वॉशिंग्टन किंवा लंडन किंवा सिडनी इथलं हवामान कसं आहे, तेसुद्धा लागलीच जाणून घेऊ शकतो. ही सारी किमया कॉम्प्युटरची आणि महाजालाची आहे.

आपल्या घरामध्ये आपण वॉशिंग मशीन वापरतो. अगदी सहजपणे आपण आपले कपडे त्या मशीनमध्ये टाकतो आणि बटण सुरू करतो. ते मशीन ते कपडे धुतं. तसं ते धुण्यासाठी किती पाणी घ्यायचं हेसुद्धा तेच ठरवतं. धुताना दोन ते तीन वेळा पाणी बदलतं. नंतर कपडे पिळून काढतं. काही मशीनमध्ये तर कपडे कोरडेठाक होतील इतके वाळून निघतात. वॉशिंग मशीनप्रमाणेच आपण मायक्रोवेव्हमध्ये अन्न गरम करतो, अमक्या

वेळेला आपल्याला काही खास काम करायचं आहे आणि ते करण्यासाठी ती वेळ चुकवून चालणार नसेल तर आपण आपल्या मोबाइलमध्येच गजर लावून ठेवतो. तसा तो लावला की मोबाइल आपलं काम चोखपणं करतो आणि ठरलेल्या वेळेला आपल्याला आपल्या कामाची आठवण करून देतो... या साऱ्या कामांमागे कॉम्प्युटरच, म्हणजेच त्याला दिलेली आज्ञावली, म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ताच असते.

'सहावं महाभूत आणि मी!' या पुस्तकात सतीश जोशी आणि शोभा बोंद्रे यांनी आपल्या आसपास किती कॉम्प्युटर असू शकतात याचं फार वेधक उदाहरण दिलं आहे. सतीश जोशी यांनी पटणी कॉम्प्युटर सिस्टिम्समध्ये जबाबदारीच्या पदांवर काम केलं. ते जपानला गेले असतानाचा एक अनुभव त्यांनी आपल्या पुस्तकात सांगितला आहे. टोकियोमध्ये टॅक्सीतून फिरताना ते आपल्या जपानी सहकाऱ्याशी, आजचं जग कॉम्प्युटरनं कसं व्यापून टाकलं आहे, याबाबत बोलत होते. बोलताना टॅक्सीत किती कॉम्प्युटर आहेत त्याची मोजदाद ते करायला लागले. त्या दोघांजवळ दोन लॅपटॉप्स होते. दोघांच्याही खिशात स्मार्ट फोन होते. जपानी सहकाऱ्यांच्या हातावर असलेलं घड्याळ अद्‌भुत होतं. अशासाठी की, त्या घड्याळामध्ये एक इवलासा कॉम्प्युटर होता. तो कॉम्प्युटर उपग्रहावरून आलेला सिग्नल पकडायचा, आणि जगातल्या ५० महानगरांतले दिनांक आणि वेळ अचूकपणे सांगायचा. ते दोघे ज्या टॅक्सीतून प्रवास करत होते, त्या टॅक्सीत जीपीएस यंत्रणा होती. त्या यंत्रणेमुळे उपग्रहाच्या मदतीनं टॅक्सीला दिशादर्शक माहिती दिली जायची. ड्रायव्हरनं गिअर बदलायचे किंवा ॲक्सिलरेटर दाबून वेग वाढवायचा किंवा कमी करायचा. टॅक्सी कुठं वळवायची हे कॉम्प्युटरच ठरवत होता! टॅक्सीमध्ये असलेला रेडिओ किंवा म्युझिक सिस्टिम कॉम्प्युटरच्या सांगण्याप्रमाणेच काम करत होती. शिवाय टॅक्सीच्या इंजिनाला इंधन पुरवणं वगैरेसारख्या कामांसाठी वेगवेगळे छोटेखानी कॉम्प्युटर होतेच!... कॉम्प्युटरनं आपल्या जगात किती आणि कसा प्रवेश केला आहे आणि आपण कॉम्प्युटरवर किती अवलंबून राहू लागलो आहोत, तेच यावरून दिसतं. आपण राहात असलेल्या इमारतीत असणाऱ्या किंवा आपल्या शाळा-कॉलेजातल्या, आई-बाबांच्या ऑफिसात असलेल्या लिफ्ट आपण सहजपणे वापरतो. पण त्यामागेसुद्धा कॉम्प्युटरच असतो.

अगोदर सांगितल्याप्रमाणं हा कॉम्प्युटर त्याच्यातल्या आज्ञावलीप्रमाणे कामं करत असतो. ही आज्ञावली म्हणजे माणसानं कॉम्प्युटरसाठी तयार केलेली कृत्रिम बुद्धिमत्ताच असते.

असाच कॉम्प्युटर रोबोटमध्ये (यंत्रमानव. पण आपण त्याला यांत्रव म्हणू या) बसवून त्याच्याकडून आपल्याला काही कामं करून घेता येतात. तसे यांत्रव आता अनेक ठिकाणी त्यांना नेमून दिलेली कामं करत आहेत. आपल्या भारतातसुद्धा बेंगळुरात असा यांत्रव आहे. दि. २९ नोव्हेंबर २०१७ या दिवशी आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इव्हांक ट्रम्प यांचं स्वागत याच यांत्रवाने केलं होतं. त्याला तयार केलं आहे, ते बेंगळुरू येथील इन्वहेन्टो रोबोटिक्स या कंपनीनं! आलेल्या ग्राहकांचं स्वागत करणं, चेहरा आणि आवाज यावरून माणूस ओळखणं, स्वत: कुठे जायचे त्याची दिशा ठरवणं अशी कामं हा यांत्रव करतो. अशी विविध कामं सहजपणं करणाऱ्या यांत्रवांबद्दलची अधिक माहिती आपण घेऊच, पण

त्यापूर्वी काही रंजक गोष्टी जाणून घेऊ या.

सन १९२१पर्यंत रोबोट हा शब्दच अस्तित्वात नव्हता. कार्ल वॅक नावाच्या एका झेकोस्लोव्हाकियन नाटककारांनी 'रोबोट' हा शब्द आपल्या नाटकात पहिल्यांदाच वापरला. त्याचा झेक भाषेतला या शब्दाचा अर्थ आहे, 'वेठीला धरलेला कामगार.' यानंतर २० वर्षांनी, म्हणजे १९४१ सालामध्ये, आयझॅक ॲसिमॉव्ह यांनी यंत्रमानवाच्या निर्मितीसाठी 'रोबोटिक्स' असा शब्द वापरला आणि नजीकच्या काळात रोबोटिक्स हा उद्योग नावारूपाला येईल, असं भाकित केलं. मात्र खऱ्या अर्थाने पहिला यांत्रव तयार केला, तो स्टॅनफर्ड रिसर्च इन्स्टिट्यूटमधील शास्त्रज्ञांनी! त्या यांत्रवाचं नाव होतं, शॅकी. हा शॅकी ठोकळ्यांची रचना करू शकत असे. त्यानंतर यांत्रिक हात असलेले यांत्रव विकसित करण्यात आले. १९६१ सालामध्ये अमेरिकेतल्या 'जनरल मोटर्स' या कंपनीनं मोटरच्या उत्पादनासाठी पहिल्या प्रथम एका यांत्रवाची 'नेमणूक' केली...

आणि आज जगातल्या विविध देशांत हजारो यांत्रव कामगारांसारखे काम करत आहेत. ॲसिमोव्ह यांनी केलेलं भाकित आज अचूक ठरलं आहे. हे आजच्या काळातले यांत्रव आणि ते करीत असलेली कामं यांचा वेध आपण पुढच्या अंकात घेऊ या.

**–श्रीराम शिधये**

*shriramshidhaye@gmail.com*

# गंमतकोडी

१) काळी मृदा आणि उबदार हवामान
मध्यम पाऊस मानवतो छान!
कापड उद्योगातील कच्चा माल जरी,
कोणते हे पीक प्रमुख व्यापारी?

२) भाजून, वाफवून उपवासाला खातात
रेताड जमिनीत जास्त करून येतात;
लाल आणि पांढरी असतात ही राव
हे एक कंदमूळ त्याचं काय नाव?

३) चुन्यासोबत आल्यावर कुंकू तयार होते
अंगाला चोळल्यास उजळपणा देते
रोजच्या जेवणात घरगुती उपचारात
कोणती ही वनस्पती हमखास वापरतात?

४) एरंडाच्या पानांसारखी
तिची पानं असतात,
मिऱ्यासारख्या काळ्या बिया
तिच्या आत बसतात...
लहानमोठ्या आकारात
पिवळ्याधमक दिसतात,
पिकल्यावर साखरेसारख्या
कोण गोड हसतात?

५) काटेरी अंग तरी आतून फार गोड
बरका असो, कापा असो त्याला नाही तोड...
पोटात याच्या असतात खूप खूप गरे,
कोकणातल्या ढेरपोट्या हा कोण बरे?

**–एकनाथ आव्हाड**

*eknathavhad23@gmail.com*

उत्तर– १) कापूस २) रताळे ३) हळद ४) पपई ५) फणस

# आगळे गुरुपूजन

आईला अभ्यासाला लावून, तिला परीक्षा द्यायला लावणाऱ्या मुलीची गोष्ट!

**तास** संपल्यावर कामतबाई टीचर्सरूममधे गेल्या तेव्हा त्यांच्या पाठोपाठ त्यांच्या वर्गातील पल्लवी दबकतच त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली.

''बाई एक विचारू ?''... पल्लवीने हळूच विचारलं.

''अगं विचार की.'' बाई

''बाई शाळेत येऊ न शकणाऱ्यांना दहावीची परीक्षा कशी देता येईल ? त्यासाठी काय करावं लागेल ?'' पल्लवीने विचारलं.

''का गं... अजून दहावीचं वर्ष सुरू झालं नाही तोच हा प्रश्न कुठून आला तुझ्या मनात ? कुणाला बसायचंय परीक्षेला ?'' बाईंनी विचारलं.

''माझ्या आईला दहावीच्या परीक्षेला बसायचंय'' ...तिच्या उत्तराने बाई क्षणभर चकित होऊन तिच्याकडे बघतच बसल्या.

''हो बाई, खरंच सांगते.'' पल्लवीने गळ्याकडे हात नेऊन सांगितलं.

''अरे वा छान छान... पण मला सांग. तुझी आई सध्या काय करतेय ?'' बाईंनी विचारलं.

''माझी आई कचरा वेचते.'' पल्लवीच्या उत्तरानं बाई एकदम अवाक.

कामतबाईंची अलीकडे या विभागातील महापालिकेच्या शाळेत बदली झाली होती. शाळेतील बहुतेक मुलं गरीब परिस्थितीतील होती. शाळेच्या जवळपासच्या बकाल वस्तीत राहणारी होती. पण त्यांच्या पालकांचे व्यवसाय किंवा इतर कुठल्याच गोष्टींची बाईंना नीटशी कल्पना नव्हती. पल्लवी दहावीच्या वर्गातील चुणचुणीत आणि हुशार मुलगी होती, म्हणून बाईंचं तिच्यावर विशेष लक्ष होतं, पण तिच्याही कुटुंबाबद्दल त्यांना आजवर काहीच माहिती नव्हती. भानावर येऊन बाईंनी विचारलं- ''तुझे वडील काय करतात ?''

''माझे वडील मी पाचवीत असताना बांधकामावरच्या अपघातात वारले. बांधकाम-मजूर होते ते. तेव्हापासून घरची आणि माझ्या शिक्षणाची सगळी जबाबदारी आईवरच येऊन पडली. आम्ही दोघीच घरी असतो. बाबा होते तोपर्यंत माझ्या आईला बाहेर जायची किंवा कसलीच माहिती नव्हती, पण त्यानंतर मात्र पैसे कमावण्यासाठी आई वस्तीतल्या आजूबाजूच्या मावशांबरोबर कचरा वेचायला जाऊ लागली. गेली कित्येक वर्षं ती पहाटे उठून आमचं जेवण बनवून कचरा वेचायच्या

कामाला जाते. तो विकते आणि त्या पैशातूनच आमचं घर चालतं बाई.''

''हो... पण मग आता एकदमच दहावीची परीक्षा देऊ शकेल ती?'' बाई.

''हो...नक्की. माझ्या आईला ना, शिक्षणाचं खूप कौतुक आहे. एकदा ती आजारी पडली होती तेव्हा समोरच्या सोसायटीतल्या २-३ जणांनी मला घरकामाला ठेवण्यासाठी आईकडे विचारलं होतं. तिची तब्येत पाहून मलासुद्धा कधीकधी वाटे की, मी असे काम करून आईला पैशाची थोडी मदत करावी. पण आईला तसं सांगितल्यावर ती रागाने दोन दिवस माझ्याशी बोलली नाही. ती म्हणाली, ''मी बचतगटातून कर्ज घेईन. वाटेल तितके कष्ट करीन, पण तू शिक्षण सोडायचं नाही. मी मोठ्ठं ऑफिसर व्हावं, अशी तिची इच्छा आहे.'' पल्लवी आईचं कौतुक सांगण्यात रंगून गेली.

''अगं हो, ते खरंय. पण तिला शिकायचंय हे कुणी सांगितलं तुला?'' बाईंनी विचारले.

''एकदा मी तिच्याबरोबर तिच्या बचतगटाच्या मिटींगला गेले होते. तिथल्या मॅडमनी सगळ्यांना 'तुमची काय काय स्वप्न आहेत?' असं विचारलं. तेव्हा 'मला शाळेतल्या मुलांना शिकवायचं होतं,' असं म्हणाली माझी आई. तेव्हा त्या मॅडमनी सर्वांसमोर तिचं खूप कौतुक केलं. तिला बाहेरून परीक्षा देऊन मॅट्रीक व्हायचा सल्ला दिला. ते पाहून मी घरी आल्यावर तिला



त्याबद्दल विचारलं. तेव्हा आई म्हणाली की, तिच्या लहानपणी गावात दुष्काळ पडला म्हणून तिच्या घरातले सगळेजण मुंबईला आले. नंतर इथे तिचं लग्नच करून दिलं गेलं. त्यात तिचं शिक्षण राहूनच गेलं. मी बरेचदा बघितलंय की, ती माझी पुस्तकं नुसतीच हातात घेऊन तंद्री लावून बसते... सामानाच्या कागदाच्या पुड्यांचे कागद सरळ करून त्यावरचे काहीतरी वाचते...''

पल्लवीचं बोलणं ऐकताना बाईंच्या गळ्याशी दाटून आलं. स्वत:ला सावरत त्या म्हणाल्या, ''तू आईला नक्की विचारून घे. आपण काहीतरी करूया.''

त्यानंतर बाईंनी एस.एस.सी. होण्यासाठी लागणाऱ्या गोष्टींची चौकशी केली. त्यानंतर मंगलताईंना, म्हणजेच पल्लवीच्या आईला, शाळेत बोलावलं. दहावीची परीक्षा देण्यासाठी त्यांची तयारी आहे का, हे विचारून घेतलं. तुम्ही शिकावं अशी तुमच्या मुलीची मनापासून इच्छा आहे, हेही समजावलं.

''बाई, ते सगळं खरंय, पन खूप वर्षांत बुकं हातात घेतली न्हाईत. तवा मला कसं जमनार?'' ...मंगलताई गोंधळून बोलल्या.

''अहो... तुम्हांला शिक्षणाची आवड आहे ना, मग तुम्हांला सगळं जमेल. तुमचे फॉर्म, पुस्तकं सगळी तयारी आम्ही करून देऊ आणि अभ्यासात काही अडचण आली तर तुमची पल्लवी आहे ना सांगायला.'' बाईंनी कौतुकाने पल्लवीकडे पाहात त्यांना धीर दिला.

वर्षभर या मायलेकींच्या दहावीच्या अभ्यासाकडे कामतबाई जातीने लक्ष ठेवून होत्या. आई पहाटे उठून भराभर जेवणखाण बनवून कचराकुंडीवर कचरा वेचायला जायची. तिथून काटेवाल्याकडे तो विकून घरी यायची. पल्लवीही आईच्या पाठोपाठ उठून राहिलेली कामं करून शाळेत जायची. दुपारी घरी आल्यावर दोघीजणी आपापल्या अभ्यासाला बसत. कचराकुंडीवरच्या दुर्गंधीने मंगलताईंना कायमची डोकेदुखी जडली होती. कचरा वेचताना बरेचदा त्यातील काच किंवा पत्रा हातात घुसून जखम होई. दिवसभर खाली वाकायचं काम असल्याने त्यांची कंबर ठणकायची. अभ्यासाला बसल्या की, दिवसभराच्या थकव्यानं हातातील पुस्तक बरेचदा गळून पडायचं. असं काही झालं की, त्यांचा परीक्षा द्यायचा उत्साह मावळायचा. पण अशावेळी न बोलता पल्लवी आईची पाठ, कंबर चेपून द्यायची. डोक्याला अलगद बाम चोळायची. त्यांचा अभ्यासाचा उत्साह वाढवायचं काम करायची. आईला अभ्यासात हजार अडचणी यायच्या. तिच्या अडचणी सोडवता सोडवता पल्लवीचा अभ्यासही रेंगाळायचा. ती वस्तीतल्या क्लासमधे जायची, पण त्याआधी आईला काहीतरी गृहपाठ देऊन! आपल्यापेक्षाही आईच्या अभ्यासाबद्दल ती विशेष दक्ष होती.


वर्षभर त्यांच्या घराला अभ्यासिकेचं स्वरूप आलं होतं. होता होता परीक्षेचा दिवस येऊन ठेपला. बचतगटाकडून घेतलेल्या कर्जामुळे त्यांची घरखर्चाची सोय झाली होती. दोघींना वेगवेगळी परीक्षाकेंद्रं आली होती. आपापल्या परीने दोघींनीही आपले पेपर्स सोडवले. घरी येऊन दोघींची त्यावर चर्चा चाले. कामतबाईही त्यात सहभागी होत. चुकण्याची शक्यता जास्ती करून मंगलताईंच्याच बाबतीत होती. पण पास होणार याची मात्र त्यांना पक्की खात्री होती. झालेही तसेच. जात्याच हुशार असलेली पल्लवी उत्तम मार्कांनी पास होऊन तिच्या शाळेत पहिली आली आणि तिची आईसुद्धा पास झाली. दोघींचा आनंद गगनात मावत नव्हता. लेक पहिली आली म्हणून तिला कुठे ठेवू आणि कुठे नको असं आईला झालं होतं, तर आईची जिद्द पाहून लेकीला आईचा अभिमान वाटत होता.


शाळेतून पहिल्या आलेल्या पल्लवीच्या कौतुकसमारंभात तिच्या आईला तर खासच आमंत्रण होतं. पल्लवीला मुख्याध्यापकांच्या हस्ते बक्षीस देतेवेळी कामतबाईंनी मंगलताईंना स्टेजवर बोलावून घेतलं. आभारप्रदर्शन करताना पल्लवीने शाळेतील गुरुजनांचे आभार मानतानाच आपली आई पहिली गुरू आहे आणि तिच्या कष्टामुळेच आपल्याला हे यश मिळालं, असं सांगितलं, तेव्हा त्या आईचे डोळे भरून आले. कामतबाईंनी मंगलताईंच्या विशेष यशाबद्दल त्यांचाही सत्कार केला. सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. मंगलताई या अनपेक्षित कौतुकाने संकोचून गेल्या. पण दुसऱ्या क्षणी पुढे येऊन धीर करून म्हणाल्या– ‘‘तुमी सगळे माझ्यापेक्षा लई मोठे आहात... शिकलेले आहात. मला बी तुमच्यासारकच शिकायच हुतं... माजं ते स्वप्न या वयात माझ्या लेकीने माजा अभ्यास घेऊन मला शिकवून पूर केलंय, तेवा माजी पहिली गुरू माझी लेकच हाये. तवा तुमच्या सगळ्यांसमोर मी तिच्याच पाया पडते.’’ ते ऐकल्याबरोबर पल्लवीने झटकन आईला अडवत घट्ट मिठी मारली. मायलेकींची ती गळाभेट पाहून कामतबाईंसह सगळ्यांच्याच डोळ्यांच्या कडा ओलावल्या. त्या आगळ्यावेगळ्या गुरुपूजनाला सर्वांनी उभं राहून मानवंदना दिली.

**–अलकनंदा पाध्ये**
*alaknanda263@yahoo.com*

ही दोन चाकं आहेत. त्या चाकांवर तुला काय काढायला आवडेल, ते काढ आणि रंगव.

**–शुभांगी चेतन**
*shubhachetan@gmail.com*





# तेरा महिन्यांचे वर्ष

अधिक महिना म्हणजे काय ? यंदा मराठी कॅलेंडरनुसार १३ महिने का आहेत ?

**पार्थ** हा आमचा जिज्ञासू विद्यार्थी.. त्याला काही ना काही तरी शंका असतातच. गेल्या वेळी त्याने पुढे जाणाऱ्या संक्रांतीची व्यथा जाणून घेतली आणि नंतर राष्ट्रीय कॅलेंडरचा वसा घेतला.

आज पार्थची स्वारी पुन्हा एकदा हजर झाली. काहीतरी प्रश्न घेऊन तो आला असणार याची अटकळ मी बांधलीच होती. पार्थने आल्या आल्याच प्रश्न केला.

''सर, स्वातंत्र्यदिन हा नेहमी ठरलेल्या तारखेलाच म्हणजे १५ ऑगस्ट किंवा सौर २४ श्रावण या तारखेलाच येतो तसा गुढीपाडवा ठरावीक तारखेलाच का येत नाही ?''

त्याच्या विधानाला पुष्टी देत मी म्हटलं, ''अरे, अक्षयतृतीया, गुरुपौर्णिमा, गणपती, दसरा, दिवाळी हे सणही विशिष्ट तारखेलाच येत नाहीत. हो ना ?''

''तेच तर, असे का, हेच मी विचारतोय ना ?'' पार्थ पुन्हा ठासून म्हणाला.

''सांगतो, हे बघ पार्थ, आपले सण-उत्सव चंद्राच्या महिन्यांवर म्हणजे तिथीवर अवलंबून असतात.''

''आता हे कुठले महिने ?'' पार्थ म्हणाला.

''अरे हे बघ, तुला हे महिने माहीत आहेत. चैत्र, वैशाख,...''

''मी सांगतो सर, ज्येष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, अश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ आणि फाल्गुन..''असं म्हणत एका दमात पार्थने सगळे महिने क्रमाने म्हणून दाखविले. पार्थ इंग्रजी माध्यमात शिकत असला तरी आपल्या सांस्कृतिक परंपरेशी असलेली त्याची नाळ तुटली नाही हे पाहून मला बरे वाटले.

''ह्यांना आपण मराठी महिने म्हणतो ना सर ?''

''अरे त्यांचं हे सोपं नाव झालं. खरं तर हे महिने चंद्राच्या कलांवर म्हणजे शुक्ल पक्ष-कृष्ण पक्ष यांवर आधारलेले महिने आहेत. म्हणून त्यांना आपण चांद्र महिनेच म्हणू या. तिथी हे चांद्र महिन्याचे एकक (unit) आहे. अशा तीस तिथी झाल्या की, चांद्र महिना पूर्ण होतो. तीस तिथी किंवा एका चांद्र महिन्याचे एकूण दिवस मात्र साडेएकोणतीसच होतात. आता अशा बारा महिन्यांचे एकूण किती दिवस होतील सांग बघू ?'' पार्थ तसा गुणाकारात पक्का आहे. त्याने लगेच अचूक उत्तर दिले. तो म्हणाला, ''३५४ दिवस.''

''बरोबर, म्हणजे चांद्र वर्षाचे एकूण दिवस ३५४ होतात. सूर्याच्या बारा महिन्यांचे दिवस ३६५

असतात. मग आता मला सांग की, गुढीपाडवा पुन्हा त्याच तारखेला कसा येईल? तो अकरा दिवस अगोदर येईल.''

''सर, अगदी बरोबर..''

''आता हेच बघ ना! २०१६ साली गुढीपाडवा ८ एप्रिल रोजी होता. त्यानंतर २०१७ साली तो २८ मार्चला आणि या वर्षी म्हणजे २०१८ साली तो १८ मार्चला आला.''

पार्थ जरा चिंतेतच होता.

''म्हणजे पुढल्या वर्षी पाडवा आमच्या ऐन परीक्षेत येणार तर. तो ७ मार्चला आला तर कसं होणार?''

''हे बघ पार्थ, चिंता करू नकोस. पुढल्या वर्षी (२०१९) गुढीपाडवा शनिवारी ६ एप्रिल रोजी येणार आहे.''

पार्थला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, ''म्हणजे पाडवा पुढल्या वर्षी चक्क १८ दिवसांनी उडी मारून पुढे जाणार? हे कसं काय?''

## सण पुढे जाण्याची योजना

''यंदाचे पाडव्यापासून सुरू होणारे वर्ष म्हणजे शके १९४० हे वर्ष आपण तेरा महिन्यांचे घेणार आहोत.''

''म्हणजे दुष्काळात तेरावा महिना का?''

''हे बघ पार्थ, कुठलाही संदर्भ कुठेही जोडू नकोस. या तेराव्या महिन्याला आपण अधिक महिना म्हणतो. आपले सण दरवर्षी १० ते ११ दिवसांनी मागे आले तर चालतील का? तसं झालं तर गोंधळच होईल. दहीहंडीचं उदाहरण घे ना. दहीहंडीचा सण पावसाळ्यात येतो. तो जर असा मागे मागे येत गेला तर काही वर्षांनी तो ऐन उन्हाळ्यात येईल. म्हणजे आज जो विद्यार्थी पहिली इयत्तेत आहे तो दहावीची परीक्षा देईल, तेव्हा दहीहंडी उन्हाळ्याच्या सुटीत येईल. मग गोविंदा; गोपाळा, असा गजर करताना पावसाच्या धारा कशा कोसळणार?''

''अच्छा, म्हणजे सण ऋतूंच्या दृष्टीने मागे मागे भरकटत जाऊ नयेत म्हणून हा 'जादा' महिना घ्यायचा तर!''

पार्थची गाडी आता रूळावर आली.

''अगदी बरोबर.''

''अधिक महिन्याच्या योजनेमुळे मागे आलेले सण पुन्हा पुढे जातात. जणू काही मागे मागे म्हणजे 'रीवर्स' आलेल्या सणांना अधिक महिन्याचा गिअर टाकून आपण पुढे नेतो असेच ना!''

''वाव! पार्थ, तू अगदी योग्य उपमा दिलीस.

यावर्षी आपण ज्येष्ठ महिना दोनदा घेणार आहोत. वैशाख महिन्यानंतर येईल तो अधिक ज्येष्ठ आणि त्यानंतर येईल तो नेहमीचा म्हणजे निज (regular) ज्येष्ठ.''

''हा अधिक महिना कोणत्या वर्षी येतो आणि कोणता महिना अधिक घ्यायचा हे कोण ठरवतो?''

पार्थचे प्रश्न तयारच होते.

''पहिल्या प्रश्नाचे उत्तर साधारण तुलाही अंदाजे कळू शकेल. बघ जमतं का?''

''दरवर्षी एखादा सण १० ते ११ दिवसांनी मागे येतो, त्यामुळे तीन वर्षांनी सण एक महिना मागे जाईल. म्हणजे अधिक महिना साधारण तीन वर्षांनी येत असावा.''

''पार्थ, तुझा अंदाज बरोबर आहे, पण अधिक महिना कोणता घ्यायचा हे सूर्य-चंद्राच्या गतीवर अवलंबून असल्यामुळे लगतच्या दोन अधिक महिन्यांमधील अंतर बरोबर तीन वर्षे असतं

नाही. यापूर्वी २०१५ साली आषाढ, तर २०१२ आणि २०१० साली अनुक्रमे भाद्रपद आणि वैशाख हे महिने अधिक आले होते. आताचा अधिक ज्येष्ठ २००७ सालानंतर पुन्हा येत आहे.''

''अरे व्वा! म्हणजे पंचांगकर्त्यांकडे ज्येष्ठाचा वशिला दिसतो आहे.''

''नाही रे बाबा, चंद्र-सूर्याकडे वशिला चालत नाही. अधिक महिना कोणता, ते सूर्य-चंद्र ठरवतात. पंचांगकर्ते ते छापतात इतकेच.''

## चांद्र महिन्यांची नावे


''पार्थ, तुझे नाव तू ठरवलेस का? नाही ना? ते तुझ्या आईवडिलांनी ठरविले ना! चांद्र महिन्यांच्या नावाचे तसेच आहे. चंद्राच्या महिन्यांची नावे चंद्र ठरवत नाही. ती सूर्य ठरवतो. सूर्य कोणत्या राशीत आहे, त्यावरून महिन्याचे नाव ठरते. १२ राशींवरून १२ महिन्यांची नावे ठरतात. सूर्य वृषभ राशीत असताना सुरू होणारा चंद्राचा महिना ज्येष्ठ असे ठरलेले आहे. अमावस्येला एक चांद्रमहिना संपून त्याच्या पुढचा महिना सुरू होतो.

चालू वर्षी १५ मे रोजी सूर्य वृषभ राशीत प्रवेश करतो. म्हणून १६ मे पासून ज्येष्ठ महिना सुरू होईल. पुढील अमावस्या १४ जून रोजी होईल. परंतु त्याही महिन्याचे नाव ज्येष्ठ असेच द्यावे लागेल, कारण सूर्याचा मुक्काम अजून वृषभ राशीतच असेल. म्हणून १६ मे ते १४ जून हा महिना ''अधिक ज्येष्ठ'' धरला जाईल आणि १४ जून ते १३ जुलै हा महिना ''निज ज्येष्ठ महिना'' म्हणून ओळखला जाईल. 'निज' याचा अर्थ नेहमीचा (regular) असा होतो. १४ जूनच्या अमावस्येनंतर दुसऱ्याच दिवशी सूर्य आपला मुक्काम वृषभ राशीतून हलवणार आहे.

पण आपल्या संकेतानुसार १४ जून रोजी सुरू होणाऱ्या महिन्याला आपण त्या पुढील, म्हणजे आषाढ हे नाव देऊ शकत नाही. थोडक्यात काय, लागोपाठच्या दोन अमावस्यांच्या दरम्यान सूर्याने आपला मुक्काम पुढील राशीत हलविला नाही तर अधिक महिना ठरलेला.''

''हे जरा डोक्यावरून गेले सर!''

''ओ. के. आपण हा मुद्दा आकृतीने स्पष्ट करू या–




वरील आकृतीवरून सूर्याचा वृषभ राशीतील कालावधी म्हणजे सौर महिना मोठा असल्यामुळे त्याच्या पोटात चांद्र महिना सामावला गेला आहे. सूर्याचा वृषभ राशीतील प्रवेश पहिल्या अमावस्येच्या किंचित अगोदर व निर्गमन दुसऱ्या अमावस्येच्या थोडे नंतर झाले आहे.''

''सर आता डोक्यात शिरले. पण अधिक महिन्याचे फळ काय ?''

''अगदी साधे, अधिक महिन्यात विद्यार्थ्यांनी कच्चा अभ्यास पक्का करावा, म्हणजे बुद्धी तल्लख होईल.''

माझे वाक्य संपते न संपते तोच पार्थने धूम ठोकली.


**–हेमंत मोने**
*hvmone@gmail.com*


मिनूची पिकनिकला जायची जोरदार तयारी सुरू आहे. तिथे तिला लागणाऱ्या काही वस्तू या अडगळीच्या खोलीत हरवल्या आहेत. त्या शोधायला तुम्ही तिला मदत कराल?

## सहज शोध

या सदरातून आपण अगदी अपघाताने लागलेल्या शोधांच्या भन्नाट कहाण्या वाचणार आहोत. वाचा कॉर्नफ्लेक्सच्या शोधाबद्दल!



# कुरकुरीत फ्लेक्स!

**काय** बालमित्रांनो, सुट्टीत सारखं तोंडात टाकायला लागतं, तेव्हा खुशखुशीत पदार्थ हवेसे वाटतात. चिप्स, चकली, खमंग मुरमुरा, कॉर्नफ्लेक्स! काय काय फ्लेवर्स निघाले आहेत ना कॉर्नफ्लेक्समध्ये? यम्मी!

केलॉग्स कंपनी कॉर्नफ्लेक्समध्ये फेमस आहे. केलॉग्स भावंडांना या चविष्ट फ्लेक्सचा शोध अगदी अचानक लागला. पार १८९४ सालातील गोष्ट आहे. विल्यम आणि जॉन केलॉग्स मिशिगन येथे एका दवाखान्यात काम करत होते. जॉन तिथला चीफ मेडिकल ऑफिसर होता, तर विल्यम मॅनेजर होता. या दवाखान्यात रुग्णांना खास पौष्टिक असे शाकाहारी पदार्थ कोणते खाऊ घालता येतील यावर जॉन विशेष संशोधन करत होता. इथून बाहेर पडताना रुग्ण कसा तंदुरुस्त होऊन बाहेर पडेल, यावर जॉन सतत विचार आणि संशोधन करायचा. विल्यम जरी मॅनेजर होता तरी त्याला पण या संधोधन क्षेत्रात भावामुळे मोठा रस निर्माण झाला. या दोघांनी ब्रेडला चांगला पर्याय काय निर्माण करू शकू, यावर प्रयोग करायचे ठरवले. गव्हाचे पौष्टिक पदार्थ त्यांना रुग्णांना उपलब्ध करून द्यायचे होते. त्यांनी गव्हाला मस्त उकळी दिली आणि त्याचा चांगला गोळा बनवायला घेतला. पण तो जेव्हा मळायला घेतला तेव्हा काही नीट मळला गेला नाही. त्याचे तुकडे मात्र तयार झाले. मग हे तुकडे त्यांनी बेक केले आणि चाखून पाहिले..

तर काय? मस्त स्वादिष्ट लागत होते. मग हे चवदार आणि भरपूर पौष्टिक असे 'ग्रॅनोज फ्लेक्स' त्यांनी रुग्णांना चाखायला दिले. हा नवा कुरकुरीत पदार्थ रुग्णांना इतका आवडला की, तिथून बाहेर पडताना रुग्णांनी तो 'घरी न्यायला विकत द्याल का?' म्हणून मागणी केली. मग विल्यमच्या डोक्यात एक कल्पना आली की, आपण गव्हाच्या ऐवजी जर मका (कॉर्न) वापरला तर? थोडा गुळचट आणि अजून मस्त लागेल.

...आणि १९०६ ला केलॉग्स कंपनीची स्थापना झाली. मग भावंडांनी तांदूळ आणि इतरही धान्याच्या कोंड्यापासून देखील पौष्टिक फ्लेक्स तयार केले. विल्यमने मग काही उत्पादनांत साखर टाकायचे ठरवले. साखर घालणे जॉनला पटले नाही. त्याने त्या कंपनीला टाटा केला. विल्यमने मग कंपनीचे नव्याने बारसे केले आणि साधारण १९२२ पासून 'डब्लू. के. केलॉग्स कंपनी' आपल्याला चविष्ट आणि कुरकुरीत नाश्ता पुरवते आहे, ते आजपर्यंत!

या सुट्टीच्या काळात तुम्ही एखादा नवा पौष्टिक पदार्थ शोधून काढायचा प्रयत्न करा. अट एकच, तो चविष्ट पदार्थ केलात तर आम्हांला चवीला पाठवायचा!

**–सोनाली कोलारकर सोनार**

*sonalisk73@gmail.com*

# कल्पकला

## पेपर बॅग

मुलांनो, आजकाल सगळे जागरूकतेने प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणस्नेही पिशव्या वापरू लागले आहेत. त्यातलाच हल्ली सर्वांच्या आवडीचा असलेला एक पिशवीचा प्रकार म्हणजे वर्तमानपत्रापासून बनविलेली बॅग. त्या बॅगला आज आपण थोडा ट्रेंडी लूक देऊया.

**साहित्य :** वर्तमानपत्राची पिशवी, क्रेप पेपर, ग्लू

**कृती :** क्रेप पेपरच्या समान लांबीच्या पट्ट्या कापून घ्या. एक पट्टी गुंडाळून त्याचा रोल करा आणि मग कात्रीने मध्ये हव्या त्या आकारात कापा. आता पट्टी उघडा. अशा प्रकारे इतर पट्ट्या कापून डिझाइन करून घ्या. फोटोत दाखविल्याप्रमाणे ह्या पट्ट्या पेपरच्या बॅगवर चिकटवा. अशी ही आपली आकर्षक रंगीबेरंगी बॅग तयार होईल.



**–स्वरूपा वक्नाली**

*swarupamv@gmail.com*




–तुषार प्रीती देशमुख
tusharptdeshmukh@gmail.com

हाय फ्रेंड्स 'छोटा शेफ' ह्या तुमच्या आवडीच्या सदरात लिहिणार आहेत सुप्रसिद्ध शेफ तुषार प्रीती देशमुख. साम टीव्हीवरील 'सुगरण' या कार्यक्रमातून आपण त्यांना पाहिलं असेल. मुलांसाठी तुषारदादा अनेक उपक्रम राबवतात. चला तर, तुषारदादाने दिलेल्या रेसिपीज करून पाहा आणि कशा वाटल्या ते आम्हांला जरूर कळवा.

## कलिंबा (मॉकटेल प्रकार)

**साहित्य :** एक बाऊल कलिंगडाच्या फोडी, एक बाऊल कलिंगड ज्यूस, अर्धा चमचा लिंबाचा रस, दोन ते तीन पुदिन्याची पानं, एक चमचा पावडर गूळ, चिमूटभर सैंधव मीठ आणि पाणी.



**कृती :** एका ग्लासमध्ये कलिंगडाच्या फोडी, कलिंगड ज्यूस, लिंबाचा रस, पाणीमिश्रित पावडर गूळ, पुदिन्याची पानं, सैंधव मीठ घालून मिक्स करून घ्या. थंडगार कलिंबा सर्व्ह करा.

## पनीर टिक्का टिक्की

**साहित्य :** दोन उकडलेले बटाटे, एक वाटी हिरवे वाटाणे, अर्धा वाटी बारीक चिरलेली सिमला मिरची, एक चमचा आलं–लसूण पेस्ट, एक बारीक चिरलेला मध्यम कांदा, एक चमचा पनीर टिक्का मसाला, तळण्यासाठी तेल, आवश्यकतेनुसार ब्रेड, कोथिंबीर, मीठ, बटर.



**कृती :** उकडलेले बटाटे, उकडलेले हिरवे वाटणे, सिमला मिरची, आलं–लसूण पेस्ट, बारीक चिरलेला कांदा, मीठ, पनीर टिक्का मसाला, कोथिंबीर घालून मिश्रण एकजीव करावे. ब्रेड पाण्यात हलके भिजवून, कुस्करून या मिश्रणात घालून मिश्रण पुन्हा एकजीव करावे. यानंतर आवडणाऱ्या आकाराच्या टिक्क्या वळून घ्याव्यात. आता एका पॅनमध्ये थोडेसे बटर टाकून नीट पसरवून घ्यावे. त्यावर वळलेल्या टिक्की दोन्ही बाजूने खरपूस भाजून घ्याव्यात.

# सुट्टी



गप्पा, दंगा आणि करा भरपूर मस्ती।
आंबे खाऊन खाऊन येऊदे सुस्ती।
हाणा लेको दररोज कॅन्डी नि गोळे।
खेळा खेळ जमवत मित्रांचे मेळे।
करवंदांच्या चिकाने माखूदेत हात।
रातांबे नि कैऱ्यांनी आंबूदेत दात।
गरे फणसाचे खात, द्या ढेकर भारी।
पिवळ्याजर्द बोंडूंची, चाखा चव न्यारी।
खाऊन जांभळं, जीभ होऊद्यात जांभूळ काळी।
भरून ठेवा श्वासात, सुरंगी नि बकुळी।

शिरून नदीत अनुभवा अंगावरली शिरशिरी।
लाटांवरून करा लेको, समुद्रसैर न्यारी।
जाम, पेरू खात, फिरा तुम्ही झोकात।
अधेमधे सर्दीपडसं डबडबू दे नाकात।
टीव्ही, मोबाइल, गेम आणि चॅटींगबरोबर।
मुव्ही, म्युझिक, पुस्तक यांचा नको विसर।
सुट्टीत हे सारं होऊन जाऊ दे दमात।
नंतर मग अभ्यासाला लागायचंय ना जोमात।

**–मेघना जोशी**
*joshimeghana.23@gmail.com*



# समशेर कुलुपघरे

—भारत सासणे

समशेर तुमच्याच वयाचा मुलगा आहे. बुद्धिमान आहे. गणितं सोडवतो, कोडी सोडवतो, संगणक शिकतो, बुद्धिबळ खेळतो, भाषा शिकतो आणि व्यायामपण करतो. त्याचे मित्र त्याला प्रेमाने 'शेरलॉक होम्स' म्हणतात! का ?... कारण त्याच्या बुद्धीचा दरारा आहेच आणि तो त्यांचा 'हिरो' आहे, पण नावच बघा ना त्याचं! 'शेरलॉक'मधला 'शेर' म्हणजे समशेर आणि 'लॉक' म्हणजे कुलूप. 'होम्स' म्हणजे घरे... हो ना ? झालं, शेरलॉक होम्स... म्हणजे 'समशेर कुलुपघरे'! त्याच्या ताज्या बुद्धिचातुर्य साहसकादंबरीची ही मालिका. 'वयम्'च्या जून २०१५ पासून मार्चपर्यंतच्या अंकांत प्रसिद्ध झालेले भाग वाचलेत ना तुम्ही ? आता वाचा

**पुढचे भाग— ३५/३६**

## समशेर आणि राक्षसाचं पाऊल!

### ३५ भिमू—शक्तिमानची कामगिरी!

**समशेरच्या** सूचनेवरून भिमू मागे वाड्यातच लपून राहिला, हे आपण बघितलंच आहे. सगळे वाड्याच्या बाहेर गेल्यानंतर तिथे काय होतं हे बघायची जबाबदारी भिमूवर टाकली होती सर्वांनी. त्यानुसार भिमू मामांच्या खोलीतल्या पडद्याआड लपून राहिला होता. त्याने पावलांचे आवाज ऐकले आणि नंतर तोंडावर कपडा बांधलेल्या दोघांना

त्याने आत येताना पाहिलं होतं.

–भिमू श्वास रोखून त्या दोघांकडे पाहात राहिला. त्या दोघांनी मामांच्या खोलीत शोध घ्यायला सुरुवात केली. पुस्तकांचं कपाट पाहून झालं. सर्वत्र तपासून झालं. हाती काही लागलं नाही, तेव्हा त्या दोघांनी बोलायला सुरुवात केली. एक म्हणाला,

''भुयारात उतरून पाहिलं... पण ती सोन्याची मूर्ती काही सापडली नाही... पण रिकामी लाकडी पेटी सापडली...''

दुसरा म्हणाला,

''नकाशाप्रमाणे तेच सिक्रेट चेंबर होतं... म्हणजे मामांनी मूर्ती तिथून हलवली असणार...''

पहिला म्हणाला,

''पण मूर्ती वाड्याच्या बाहेर गेलेली नाही! नक्कीच ती लपवली असेल! बघ जरा नीट...''

दुसरा खोलीच्या मध्यभागी ठेवलेल्या गोल टेबलाकडे संशयाने पाहात राहिला. मग म्हणाला,

''या टेबलात तर नसेल?''

टेबलात एवढी मूर्ती कशी ठेवणार?''

''काही असो! मूर्तीपेक्षा त्याच्या छातीवर लिहिलेला लेख आपल्याला महत्त्वाचा आहे कारण, त्यात गुप्तधनाचा पत्ता लिहिलाय... हो ना?''

''अगदी बरोबर! आणि म्हणून आपण त्या मामांना उचलून नेलं पाहिजे... तळघर-गुहेत नेऊन ठेवलं की मग स्वत:च मूर्ती कुठे आहे ते सांगतील आपल्याला... आणि गुप्तधनाचा पत्ताही सांगतील...''

''तुझं बरोबर आहे! पण बघू साहेब काय म्हणतायत ते...''

आपल्या भिमू-शक्तिमानची अवस्था काय झाली असावी? त्याची छाती प्रचंड वेगाने धडधडू लागली होती आणि त्याला राग पण यायला लागला होता. म्हणजे हे बदमाश मामांना उचलून नेणार? त्याच वेळेस पहिल्याची नजर पडद्याकडे गेली. हळूहळू तो पडद्याच्या दिशेने यायला लागला. कदाचित त्याने पडदा सरकवून मागे पाहिलंही असतं, पण अचानक एक नाट्य घडलं. मामांच्या खोलीत दरवाजातून गणपतराव गडबडीने आत आले. त्यांनी बाळकरामला पकडून आणलं होतं. ते रागाने म्हणाले,

''हा ऐकत नाही!... याला सांगितलेलं काम करत नाही म्हणतोय... मग दुसऱ्याकडून करवून घ्यावं लागलं...''

तोंडावर कपडा असलेला तो पहिला बदमाश थांबला. मग मागे वळून म्हणाला,

''असं असेल तर त्याला तळघर-गुहेकडे घेऊन जाऊ आणि बांधून ठेवू... साहेबांच्या तशाच सूचना आहेत... चला आता... सगळा वाडा पाहिला... काही सापडलं नाही... ते लोक परत येण्याच्या आधी इथून गेलं पाहिजे...''

आणि मग त्या दुष्टांनी बाळकरामची जवळ जवळ उचलबांगडी केली आणि ते तिघे वाड्याच्या बाहेर पडले. वाड्याच्या जवळ एक खटारा उघडी जीप उभी होती. त्यांनी बाळकरामला त्या जीपमध्ये उचलून ठेवलं आणि ते सगळे जीपमध्ये बसले. एकाने जीप चालवायला सुरुवात केली.

आपला भिमू-शक्तिमान एव्हाना पडद्याबाहेर आणि वाड्याबाहेरसुद्धा आला होता. बाळकरामला असं उचलून नेताना पाहून त्याला संताप यायला लागला. काही अंतर सोडून जीपचा पाठलाग करायचा असा त्याने निर्णय घेतला. भिमू-शक्तिमान जीपवर लक्ष ठेवून आणि बरंचसं अंतर ठेवून जीपच्या मागे मागे धावत राहिला. उंच गवत आणि झाडी, त्याचबरोबर वाढता अंधार

यामुळे त्यांचं मागे लक्ष गेलं नाही. काही अंतर गेल्यानंतर त्यांनी जीप थांबवली. तिघेही बाळकरामला उचलून पायवाटेने तळघर नावाच्या गुहेकडे जायला निघाले.

मित्रहो, या तळघराची तुम्हांला माहिती आहे ना? तो जाड माणूस तिथे बसून कशाची तरी दुरुस्ती करत होता, हे तुम्हांला आठवतंय ना? याच तळघर नावाच्या गुहेत सुनंदाताई शिरली होती आणि वेळेवर तिथून बाहेर सटकली होती. इथूनच तिने संवादाचं रेकॉर्डिंग म्हणजे ध्वनिमुद्रण केलं होतं. याच तळघर-गुहेकडे आता ते तिघे चालले होते आणि आपला भिमू त्यांच्यावर लक्ष ठेवून होता.



भिमूने जरा उंचावरची जागा निवडली. त्या खडकाआडून त्याला तळघर-गुहेची वाट दिसत होती, पायऱ्याही दिसत होत्या आणि खालून येणारी वाट पण दिसत होती. बाळकरामला त्या गुहेत ते लोक बांधून ठेवणार होते, या कल्पनेचाच त्याला अतिशय तिटकारा वाटायला लागला. ही गोष्ट आपल्या कॅप्टनला-समशेरला सांगितलीच पाहिजे असं त्याला वाटू लागलं.

त्या तिघांनी बाळकरामला उचललं आणि तळघर-गुहेकडे पायऱ्या उतरून त्यांनी प्रवेश केला. नंतर ते अर्थातच नजरेच्या आड झाले. जवळ जवळ पाच ते आठ मिनिटं वाट पाहिल्यानंतर मात्र भिमू-शक्तिमानचा धीर सुटला. त्याने आपल्या लपायच्या जागेमधून बाहेर येऊन आंबेगावकडे उतरत्या कच्च्या पायवाटेवरून धावायला सुरुवात केली. त्याला समशेरला गाठून घडलेली हकिकत सांगायची होती. जमेल तितक्या वेगाने आपला भिमू धावत राहिला आणि त्याने वाड्यात प्रवेश केला. अजूनही कुणी आलं नव्हतं आणि म्हातारा नोकर चक्क झोपला होता. त्याने घाईघाईने मामांच्या खोलीत प्रवेश केला. तिथल्याच वहीत आणि तिथल्याच पेन्सिलने त्याने गुप्त भाषेत संदेश लिहिला. अगदी

जे पाहिलं ते सगळं. तो कागद दिसेल असा समोर ठेवला आणि त्याने वाड्याच्या बाहेर येऊन पुन्हा तळघराकडे धावायला सुरुवात केली. लवकरच त्याने आपला लपायचा खडक गाठला. खडकाआड बसकण मारून तो तळघर-गुहेच्या प्रवेशद्वाराकडे नजर रोखून बसला. त्याला अगदी चोख पहारा करायचा होता.

आणि त्याच वेळेस त्याने ते आश्चर्यकारक दृश्य पाहिलं. त्याने चक्क सुनंदाताईला येताना पाहिलं. ती चोरट्या पावलांनी हळूहळू तळघर-गुहेकडे निघाली होती. सुनंदाताईला तिथे पाहून भिमूला आश्चर्याचा धक्काच बसला. पण तिला सावध करण्याच्या आधीच ती पायऱ्या उतरून तळघर-गुहेत जाऊन पोहोचली होती. भिमूला काहीच कळेना. ते तीन बदमाश तिथे असताना आपली सुनंदाताई तिथे कशासाठी गेली, हे समजणं भिमूच्या बुद्धीपलीकडचं होतं. पण त्याला एक जाणीव झाली. आपली सुनंदाताई धोक्यात आहे. तो पटकन खडकावर चढला. जितकं उंच जाता येईल तितका उंच गेला आणि त्याने गुप्त भाषेतला संदेश हवेमध्ये पाठवला- मटिटिव्ह... टिटिव्ह... टॉक् टॉक्फ आणि मग भिमू-शक्तिमान हा संदेश पुन्हा पुन्हा पाठवत राहिला.

हाच संदेश समशेर आणि मित्रमंडळींनी ऐकला होता, हे आपण पाहिलंच. बघूयात पुढे काय होतं ते!

## ३६ सुनंदाताई तळघरात शिरते!

**मित्रहो,** थोडंसं मागे जावं लागेल. त्याशिवाय सुनंदाताई इथे कशी आली हे आपल्याला कळणार नाही.

राक्षसाला पाहिल्यानंतर जीप वळवून घ्याव्या लागल्या. दुसऱ्या जीपमध्ये मुलं, मामा, बगळेकाका आणि सुनंदाताई इतके सगळे बसले होते. डोंगराचा उतार, वळण आणि पाऊस यामुळे मागची जीप अगदी हळूहळू पुढे सरकत होती. सुनंदाताई खाली उतरून जीपबरोबरच चालायला लागली होती. त्यामुळे कधी ती पुढे, तर कधी जीप पुढे असा प्रवास चालू होता. समशेरने काहीतरी पाहिलं होतं आणि कसला तरी ओळखीचा असा वास त्याला आला होता. त्यामुळे तो अतिशय विचारात गढला होता. त्यामुळे त्याचं सुनंदाताईकडे लक्षच नव्हतं. त्याच वेळेस सुनंदाताईला अनामिक असा फोन आला होता अनोळखी नंबरवरून. बोलणारा आवाज ओळखीचा होता. तो बाळकराम होता. अतिशय व्याकूळ आवाजात बाळकराम म्हणाला,

‘‘ताई, त्यांनी मला बांधून ठेवलंय... मला त्यांचं काम करायचं नाहीय... नजर चुकवून मी त्यांच्याच फोनवरून बोलतोय... परत संधी येणार नाही... मला इथून सोडव... मला हे काम नको... मला तुमच्यासारखं शिकायचं आहे... इथे अंधार आहे आणि मला भीती वाटतेय...’’

‘‘अरे पण तू आहेस तरी कुठे? आणि कोणी बांधून ठेवलंय तुला?’’

‘‘तळघर-गुहा!... तू उतरली होतीस ना तिथे... तीच गुहा!... त्यांनी मला उचलून आणलंय... मला सोडव...’’

त्यानंतर परत आवाज आलाच नाही. बाळकरामने घाईघाईने फोन बंद केला

असणार. सुनंदाताईला काय करावं सुचेना. मात्र, छोटा बाळकराम संकटात सापडल्यामुळे तिचं विशाल हृदय एकदम हेलावलं. कसंही करून त्या बिचाऱ्याला तिथून सोडवलंच पाहिजे असा विचार तिच्या मनात यायला लागला. एव्हाना जीप क्रमांक दोन हळहळू पुढे सरकली होती आणि रस्ता सोडून खाली उतरायची पायवाट सुनंदाताईला दिसायला लागली होती. आता वेळच नव्हता. कुणाला सांगून उपयोग नव्हता. कारण मग सगळ्यांनाच कळलं असतं. काय निर्णय घ्यायचा तो आत्ताच आणि याच क्षणाला. या पायवाटेने धावत गेले तर दहा मिनिटांत तळघर-गुहेच्या रस्त्याला लागू शकू. सुनंदाताईने पाठीवरची आपली प्रवासी बॅग चाचपली आणि तिने निर्णय घेतला. ती शूर मुलगी आपल्या लहान भावासारख्या बाळकरामला सोडवण्यासाठी



एकटीच धावत निघाली आणि भिमू-शक्तिमानने तिला नेमकं पाहिलं होतं आणि गुप्त संदेश पाठवला होता.

* * *

सुनंदाताई आवाज न करता पायऱ्या उतरली आणि तळघर-गुहेत जाऊन पोहोचली आणि समोर गुडुप्प अंधार. काहीच दिसायला तयार नाही. तशी ती यापूर्वी इथे आली होती. पण तो दिवस होता आणि आता रात्र झालीय. त्यातून हलका

हलका पाऊस पडत होता. अगदी अनोळखी अशा गुहेमध्ये एकट्याने प्रवेश करण्यासाठी खूप हिंमत पाहिजे. सुनंदाताईने खोल श्वास घेतला. स्वत:तल्या भीतीवर मात केली आणि बाळकरामला सोडवण्यासाठी तिने हळूहळू पुढे सरकायला सुरुवात केली. शत्रुगोटातला मुलगा असला तरी काय झालं? त्याने मदतीसाठी हाक मारली होती आणि बाळकरामला सोडवणं आवश्यक आहे असं त्या शूर मुलीला वाटलं होतं.

एक एक पाऊल पुढे. हळूहळू आणि सावकाश सावकाश. चाचपडत चाचपडत सुनंदाताई पुढे सरकत राहिली. काहीच आवाज नव्हता. पूर्वी ती जिथे लपली होती त्या खांबाआड ती उभी राहिली आणि आता थोडं थोडं दिसायला लागलं होतं. नंतर ती पुढच्या खांबाच्या आड उभी राहिली. समोर जमिनीवर एक मुटकुळं पडलेलं होतं. हातपाय बांधलेलं. तिकडून खोल असा आवाज आला.

''सुनंदाताई, मी इथे आहे...''

सुनंदाताई पटकन त्या दिशेने गेली. गुडघे टेकून खाली बसली. म्हणाली,

''डोंट वरी बाळकराम!... मी तुला सोडवायला आलेय!... मी तुझे हातपाय सोडते आणि मग आपण पटकन इथून जाऊ...''

आणि सुनंदाताई दोऱ्या सोडण्याच्या प्रयत्नाला लागली. तेवढ्यात मागून कोणीतरी म्हटलं,

''इतकी घाई कसली आहे?... थोडा वेळ तू पण इथे आराम कर ना...''

एक उसळी मारून सुनंदाताई उभी राहिली आणि तिने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. पण त्या धटिंगण बदमाशांसमोर तिचं काही चाललं नाही. त्यांनी तिचेही हात मागे खेचून बांधले. एक म्हणाला,

''तू इथं यायला नको होतंस. आता तू अडकलीस. आता साहेबच ठरवतील काय करायचं ते! आम्ही तुला खुर्चीवर बसवून बांधणार आहोत... गुपचूप बसून राहा... ओरडायचं नाही–''

दुसऱ्याने कुठूनतरी प्लॅस्टिकची खुर्ची आणली. त्यांनी सुनंदाताईला खुर्चीवर बसवलं आणि बांधून टाकलं. आता मात्र सुनंदाताई शांत झाली होती आणि ती कराटे-व्यायाम पद्धतीने श्वास घ्यायला लागली होती. तिला हाताच्या व्यायामाच्या प्रकारातून मनगटाले बांधलेले दोर सैल करायचे होते आणि ती लगेचच त्या कामाला लागली. गुहेत अतिशय शांतता होती. अंधार होता. थोडी भीती वाटत होती आणि आपली तिथून सुटका कशी होईल याचा कोणताही अंदाज नव्हता. पण तरीही ती शूर मुलगी न डगमगता आणि आलेल्याला संकटाला तोंड द्यायच्या तयारीने श्वासोच्छ्वासाचे व्यायाम करीत राहिली. आपले मित्र आपल्याला सोडवण्यासाठी येतीलच याची तिला खात्री वाटत होती. आणि ती शांतपणे वाट पाहात राहिली. तिच्या मनगटाच्या भोवतीच्या दोऱ्या हळूहळू सैल व्हायला लागल्या. तिला खात्री वाटत होती, त्याप्रमाणे समशेर आणि मित्रमंडळ इथे येणार होतं? कळेलच, आता!

**( क्रमशः )**



**–भारत सासणे**

*bjsasne@yahoo.co.in*

# दृष्टी आणि दृष्टिकोन

**आशना** शाळेतून आली ती लाल लाल डोळे आणि नाकाने सुं सुं करतच. आता आज काय झालं असेल याचा अंदाज घेत आई तिला म्हणाली, ''आज परत का गं? कशावरून?''

''भांडण नाही झालं, पण आज माझ्यामुळे आमची टीम हरली. बसमध्ये 'गेस द वर्ड'मध्ये मला ते काय दाखवत होते ते नीट दिसतच नव्हतं, त्यामुळे वर्ड चुकला. सगळे मला म्हणत होते, आर्णाची टीम जिंकावी म्हणून मी मुद्दामहून असं केलं.''

लेकीला जवळ घेत आई म्हणाली, ''तू मुद्दाम नक्की केलं नसणार, मला माहीत आहे, तुला लांबचं नीट दिसत नाही ना?''

''तसं काही नाही, कधी कधी दिसत नाही. पण मी डोळ्यांच्या डॉक्टरकडे येणार नाही, मला चष्मा नको. मी कशीतरीच दिसेन, सगळे मला अजून चिडवतील.'' हे म्हणता म्हणता आशना हात पाय आपटतच आत गेली.

आता हिला कसं समजवावं आणि डोळ्यांच्या डॉक्टरकडे घेऊन जावं, हेच आईला कळत नव्हतं.

रात्री जेवणाच्या टेबलवर सगळे जण असताना आज विषय काढायचाच असं तिने मनातल्या मनात ठरवलं, अर्थात आजी, आबा आणि बाबाला पण त्या प्लॅनमध्ये सामील करून घेतलं.

''अवि, मला ना जरा डोळ्यांच्या डॉक्टरकडे जायचंय, नवीन चष्मा करायला.'' आजी मुद्दामहून आशनाकडे बघत म्हणाली.


''आई तू तर दर दोन वर्षांनी डोळे तपासून त्यानुसार नवा चष्मा करतेस ना?''

''अरे, हो. मी खूप वाचते ना, त्यामुळे नंबर वाढतो माझा. आणि चष्म्यामुळे मला नीट दिसतं, जग सुंदर वाटतं, म्हणून तर मी हे सगळं एन्जॉय करू शकते..''

''आजी, मला माहितीये, मी डोळ्यांच्या डॉक्टरकडे यावं म्हणून हे सगळं सुरू आहे.''

''आशू, आता मी काय म्हणते ते नीट ऐक, या वर्षी तुझ्या वह्या अधूनमधून रिकाम्या असतात, मग आपल्याला आर्णाकडून नोट्स आणून त्या पूर्ण कराव्या लागतात. तुला फळ्यावरचं नीट दिसत नाहीये. तुला टीव्हीवरचं नीट दिसत नाही म्हणून तू टीव्हीच्या जवळ जातेस. लांबचं नीट दिसत नाही... हो की नाही. ?''

''पण मला सगळेजण चिडवतील, मी छान



नाही दिसणार?''

''म्हणजे तुला मान्य आहे की तुला लांबचं नीट दिसत नाही, आता मला सांग, लोकांना चिडवायची संधी आपणच देत असतो. आता बघ, आपल्या घरात प्रत्येकाला चष्मा आहे, फक्त तुला नाही, त्यामुळे चष्मा आला तर बिनधास्त सांग सगळ्यांना, मी एकटीच आमच्या घरात ऑड गर्ल आऊट होत होते, म्हणून मग मी पण चष्मा लावायला सुरुवात केली.''

''आशना, तुला चष्मा लागला तर आपण त्यांना नवीन फॅशनची छानशी फ्रेम घेऊ हं!''

''आज्जी येस..'' म्हणत आशना तिच्या गळ्यात पडली, तेव्हा आशनाच्या आईनेच एक मोठ्ठा नि:श्वास सोडला.

त्याच आठवड्यात मग ते सगळेजण त्यांच्या नेहमीच्या डोळ्यांच्या डॉक्टरकडे गेले, तेव्हा घरातला राहिलेला मेंबर पण पेशंट झाला म्हणून ते डॉक्टरकाकासुद्धा हसले. डॉक्टरकाकांनी तिला चष्मा लागण्याची कारणं नीट सांगितली, आणि शेवटी म्हणाले, ''आता बघ, उंच आई बाबांचा मुलगा उंच होतो, तसंच चष्मा असणाऱ्या आईबाबांच्या मुलालाही चष्मा लागतोच. फॅमिली ट्रॅडिशन आहे म्हणायचं आणि मान वर करून चालायचं.''

दोन दिवसांनंतर चष्मा लावून बाईसाहेब आर्णाच्याच घरी गेल्या.

''आशना, तू तर दीपिका पडुकोणसारखीच दिसतेस की गं. गालावर खळी आणि चष्मा. मस्त.''

मग त्या दोघींचं मेतकूट सुरूच राहिलं. आता त्यांना बोलायला 'चष्मा' हा एक नवा विषय मिळाला होता. निघता निघता आर्णा तिच्या आईला म्हणाली, ''आई, मला पण चष्मा हवा, आशना काय मस्त स्कॉलर दिसते. आपण कधी जायचं डोळ्यांच्या डॉक्टरकडे?''

नाकावर घसरणारा चष्मा बोटाने सरकवत आशना मनातल्या मनात हसत होती... आजी म्हणते तसं, तिची नजर एकदम साफ झाली होती. सगळं नीट दिसायला लागलं होतं.''

**-मानसी होळेहोन्नुर**
*manasi.holehonnur@gmail.com*

अहम् आवाम्
वयम्
कल्पक, चौकस किशोरांचे मासिक

'वयम्' न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७० इमेल : info@wayam.in वेबसाइट : www.wayam.in

**वाचकांमध्ये 'वयम्'ची लोकप्रियता वाढत आहे. 'वयम्'चे सभासदत्व घेण्यास उत्सुक असलेल्यांच्या सोयीसाठी आमच्या प्रतिनिधींची ही यादी. हे 'वयम्' प्रतिनिधी म्हणजे 'वयम्'चा प्रसार प्रेमाने करणारे दूत आहेत.**

## 'वयम्' प्रतिनिधी

**गोरेगाव-मुंबई**
अनघा अनिल चंद्रात्रे
8080550353

**सांताक्रूझ-मुंबई**
मीनल भास्कर दीक्षित
7021542701

**अंधेरी**
कविता सावंत
9930796085

**वसई**
शीतल गुरुनाथ वेरलकर
9869848781

**गिरगाव-मुंबई**
मेसर्स बी.डी.बागवे एजन्सी
7506000869

**वरळी-मुंबई**
संजना चव्हाण
9221969336

**भांडुप-मुंबई**
वनिता शिवराम आर्य
9768666155

**डोंबिवली**
वृषाली देशपांडे
9820666435

**कल्याण**
डॉ. योगेश जोशी
9757077614

**कल्याण**
विकास वाचनालय
9969270505

**बदलापूर**
नेत्रा नरवणे
9604677297

**कर्जत रायगड**
संजय वझरेकर
9975576675

**अलिबाग**
श्रुती संतोष बोंद्रे
9423381129

**चिपळूण**
मिलिंद पिंपुटकर
9423294230/
02355–257185

**रत्नागिरी**
डॉ. निधी पटवर्धन
9421439664

**रत्नागिरी**
नथुराम तानाजी देवळेकर
9423292465

**दापोली**
अथर्व सोमण
9404159391

**वेंगुर्ला-सिंधुदुर्ग**
मधुरा नित्यानंद आठलेकर
9405925454

**कुडाळ-सिंधुदुर्ग**
श्रद्धा मालवणकर
8097971721

**नाशिक**
तेजस पुराणिक
8806821336

**जुन्नर-पुणे**
विकास घोगरे
9967230185

**कराड**
संजय पुजारी (डॉ. कल्पना चावला विज्ञान केंद्र)
9226163260

**सातारा**
अरुण गणेश राजहंस
9112648376

**जळगाव**
राजेश खोडके
9420388379

**लातूर**
ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र
9421693089

**लातूर**
वैद्य. जयश्री कुलकर्णी
9326190749

**बुलडाणा**
नरेंद्र लांजेवार
9422180451

**औरंगाबाद**
मधुकर लक्ष्मण वैद्य
9881242856

**अकोला**
भूषण बापट
8275725886

अहम् आवाम्
# वयम्
आपला मित्र

न्यू वंदना को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, ३रा मजला,
लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७०/७१/७२/७३
राजेंद्र : ९९२०७२४६२७
ई-मेल : info@wayam.in वेबसाईट : www.wayam.in



## सभासद नोंदणी फॉर्म

**१ वर्ष ₹३००/-**
१०+१ दिवाळी अंक

**३ वर्ष ₹७००/-**
३०+३ दिवाळी अंक

**५ वर्ष ₹११००/-**
५०+५ दिवाळी अंक

नोंदणी क्र. ____________ दिनांक ____________

नाव : ____________

पत्ता : ____________

____________ पिन कोड : ____________

जवळची खूण : ____________

फोन : ____________ ई-मेल : ____________

जन्मतारीख : ____________ इयत्ता : ____________

शाळा : ____________

१ वर्ष (१०+१ दिवाळी अंक) ₹३००/- ३ वर्षे (३०+३ दिवाळी अंक) ₹७००/-
५ वर्षे (५०+५ दिवाळी अंक) ₹११००/-

जमा तपशील

चेक नं.: ____________ बँक व बँक शाखा : ____________

चेक दिनांक : ____________ रुपये : ____________

'वयम्'चे सबस्क्रिप्शन आता ऑनलाईन सुद्धा. ऑनलाईन सबस्क्रिप्शनसाठी खालील माहितीचा आधार घ्या.
**Labindia Analytical Instruments Pvt. Ltd.**
Axis Bank, Thane | CC A/C No.: 911030017556004 | IFSC Code : UTIB0000061

चेक / डिमांड ड्राफ्टः लॅबइंडिया ॲनॅलिटीकल इन्स्ट्रुमेंट्स प्रा.लि.
(Labindia Analytical Instruments Pvt. Ltd.) या नावाने काढावा. सही ____________




*'वयम्' मासिकाचे वर्गणीदार झाल्याबद्दल धन्यवाद!*

RNI NO.MAHMUL/2013/53138 POSTAL Reg. No.THC/85/2017-2019 Post at Mumbai Patrika Channel Sorting Office G.P.O. Mumbai 400 001
Published on 1st of every month and posted on 5th of every month

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक

# वृद्धी आणि विश्वास यांचा सर्वोत्कृष्ट समतोल



आम्हाला मिळत असलेला सातत्यपूर्ण व निश्चयी पाठिंबा, तसेच आमच्या प्रगतीच्या दूरदृष्टीवरील निश्चल विश्वासाबद्दल आम्ही आमच्या सर्व भागधारक, हितचिंतक व ग्राहकांचे आभारी आहोत.

## लेखापरिक्षित निकाल

| तपशील | ३१-०३-२०१८ रक्कम (₹ कोटींमध्ये) | ३१-०३-२०१७ रक्कम (₹ कोटींमध्ये) |
|---|---|---|
| एकूण उलाढाल | १५३४० | १४३५१ |
| ठेवी | ९८७५ | ९३५१ |
| कर्जे | ५४६५ | ५००० |
| ढोबळ नफा | २०२ | १६९ |
| निव्वळ नफा | १२६ | १०२ |
| स्वनिधी | १००१ | ८७५ |
| ढोबळ अनुत्पादित कर्जे | ४.७५% | ४.६९% |
| निव्वळ अनुत्पादित कर्जे | ०.२२% | ०.२०% |
| पुंजी पर्याप्तता | १४.२०% | १३.८२% |

tjsbonline | tjsbbank | tjsbbank | tjsb-sahakari-bank-ltd | tjsbbank.co.in